


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०५७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




## 12 जिल्हा परिषद व 125 पंचायत समित्यांच्या निवडणुका जाहीर

# ५ फेब्रुवारीला मतदान, ७ फेब्रुवारीला निकाल!



**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

नगरपालिका व महापालिका निवडणुकांनंतर राज्याचे लक्ष लागलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची अखेर घोषणा झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून आज १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश काकाणी यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली.

घोषणेनुसार, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी व निकाल जाहीर केले जाणार आहेत. निवडणूक जाहीर होताच संबंधित जिल्ह्यांत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

या जिल्ह्यांत निवडणूक : या टप्प्यात राज्यातील १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, पुणे, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि धाराशिव या जिल्ह्यांचा समावेश आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक असलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका दुसऱ्या टप्प्यात घेतल्या जाणार आहेत. याबाबत सर्वोच्च न्यायालय यांचा पुढील निर्णय अपेक्षित आहे. न्यायालयाने आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिल्याने १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणे आयोगावर बंधनकारक राहणार आहे, असे दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कुलाबा मतदारसंघातील उमेदवारी अर्ज न स्वीकारण्याच्या प्रकरणी आयोगाकडे प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. यावर आयोगाने सांगितले की, संबंधित ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असून कार्यवाही कायद्यानुसारच झाली आहे. अर्ज स्वीकारण्यापूर्वी तीन वेळा पुकार करण्यात आली होती, त्यानंतरच दरवाजे बंद करण्यात आले, असेही स्पष्ट करण्यात आले.

मतदानाच्या ४८ तास आधी जाहीर प्रचारावर बंदी असेल. सार्वजनिक सभा, मिरवणुका, माईकचा वापर करता येणार नाही. मात्र, घरोघरी जाऊन प्रचार करण्यास बंदी नाही, असे आयोगाने स्पष्ट केले. हा नियम २०१२ पासून लागू असून नवीन आदेश दिलेला नाही, असेही आयुक्तांनी सांगितले.

महापालिका निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान व ७ फेब्रुवारीला निकाल जाहीर होत असतानाच, त्यानंतर ग्रामीण महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे.

### संपूर्ण निवडणूक कार्यक्रम

- नामनिर्देशन स्वीकारणे: १६ जानेवारी ते २१ जानेवारी २०२६
- उमेदवारी अर्जांची छाननी: २२ जानेवारी २०२६
- अर्ज माघारीची अंतिम मुदत: २७ जानेवारी २०२६, दुपारी ३ वाजेपर्यंत
- अंतिम उमेदवार यादी व चिन्ह वाटप: २७ जानेवारी २०२६, दुपारी ३.३० नंतर
- मतदान: ५ फेब्रुवारी २०२६, सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३०
- मतमोजणी: ७ फेब्रुवारी २०२६, सकाळी १० वाजतापासून

### निवडणूक काळातील कारवाई

- आतापर्यंत ७ कोटी रुपयांची रक्कम जप्त.
- मद्यपदार्थांसह ५ कोटींपेक्षा अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त.
- ९५ शस्त्रास्त्रे जप्त.
- राज्यातील ३७९६ मतदान केंद्रे संवेदनशील घोषित.

## थोडक्यात...

### देवेंद्र फडणवीसांचा झंझावात!

**पुणे (समर्थ गांवकरी) :** राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी सुरु असलेला प्रचाराचा धुरळा आता अखेर खाली बसला आहे. गेल्या 14 दिवसांपासून सुरु असलेल्या या धावपळीत सर्वच पक्षांनी आपली पूर्ण शक्ती लावली होती. यामध्ये सत्ताधारी महायुतीची बाजू सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण राज्यात प्रचार केला. आता प्रचाराची मुदत संपल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्याची आकडेवारी समोर आली असून त्यांनी सभा आणि संवादाचा एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वाधिक 7 सभा त्यांनी मुंबईत घेतल्या, तर नागपूरमध्ये 5 आणि पुण्यात 2 सभांच्या माध्यमातून त्यांनी जनतेला संबोधित केले. या काळात एकूण 77 मोठे कार्यक्रम केले. यात 37 मोठ्या जाहीर सभांचा समावेश होता.

### भोसरी भूखंड घोटाळ्यात एकनाथ खडसेंना धक्का

**पुणे (समर्थ गांवकरी) :** भोसरी एमआयडीसी भूखंड घोटाळा प्रकरणात माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे यांना उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. विशेष न्यायालयाने दोषारोप निश्चितीला स्थगिती द्यावी, अशी खडसेंनी केलेली मागणी न्यायालयाने फेटाळून लावली आहे. याचिकेत झालेल्या विलंबाकडे बोट दाखवत उच्च न्यायालयाने कोणतीही अंतरिम स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे येत्या 16 जानेवारी रोजी एकनाथ खडसे, त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांच्यावर आरोप निश्चित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे खडसे यांच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या असून राजकीय वर्तुळात या प्रकरणाची चर्चा जोरात सुरु झाली आहे.

## प्रवासी बसच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू




**पुणे: (समर्थ गांवकरी)**

प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना येरवड्यातील शास्त्रीनगर चौकात घडली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी तरुण जखमी झाला. या प्रकरणी लक्ष्मीनगर पोलिसांनी बस चालकाला अटक केली.

हर्ष लाड असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. अपघातात करण अमित जाधव (वय २१, रा. कल्पतरु सोसायटी, बोरीवली, मुंबई) जखमी झाला. या प्रकरणी प्रवासी वाहतूक करणारा बस चालक जयवंत हरिभाऊ बोरेकर (वय ४६, रा. खडकी बुद्रुक, ता.मंगळूरपीर, जि. अकोला) याला अटक करण्यात आली. याबाबत करण जाधव याने लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ जानेवारी रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास हर्ष लाड आणि त्याचा मित्र करण जाधव हे दुचाकीवरुन नगर रस्त्यावरुन निघाले होते.

- **येरवड्यातील शास्त्रीनगर चौकात अपघात**

येरवड्यातील शास्त्रीनगर चौकातील सिग्नलला ते थांबले होते. त्या वेळी पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या प्रवासी बसने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातात हर्ष आणि त्याचा मित्र करण हे जखमी झाले. गंभीर जखमी झालेल्या हर्ष आणि करण यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच हर्ष याचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर बस चालक बोरेकर याला अटक करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक विभुते तपास करत आहेत.

## रविंद्र धंगेकरांचा पुण्यात राजकीय बॉम्ब

### संस्कृतीच्या गप्पा आणि डान्सबारचे आरोप; मतदानाआधी खळबळ




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे मतदान उद्या पार पडणार असून पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय वातावरण अक्षरशः तापले आहे. विविध मुद्द्यांमुळे आधीपासूनच चर्चेत असलेल्या या निवडणुकांनी अखेरच्या टप्प्यात आरोप-प्रत्यारोपांचा उच्चांक गाठला आहे. सत्तेत एकत्र असलेले पक्ष महापालिका निवडणुकीत मात्र वेगवेगळ्या आघाड्यांतून आमनेसामने उभे ठाकलेले दिसत आहेत. रोज एकत्र बसून निर्णय घेणारे नेते प्रचारात मात्र एकमेकांवर शब्दांचे बाण सोडताना दिसले. या सगळ्या गदारोळात पुण्यातील राजकारण अधिकच चिघळले असून मतदानाच्या अवघ्या एक दिवस आधी शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमुळे मोठी खळबळ उडाली आहे. पुणे महापालिका निवडणूक अनेक कारणांनी चर्चेत राहिली. भाजप आमदार महेश लांडगे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील शाब्दिक युद्धाने आधीच वातावरण तापवले होते. त्यातच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आणि भाजपने पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये काही वादग्रस्त आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना उमेदवारी दिल्याचा आरोप समोर आला. या मुद्द्यावरून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली. निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या प्रत्येक मुद्द्याला अधिक धार येत असतानाच धंगेकरांच्या पोस्टने या चर्चेला आणखी वेगळं वळण दिलं आहे. रविंद्र धंगेकर यांनी आपल्या सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये थेट भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी म्हटलं आहे की, उमेदवारी वाटप करताना भारतीय जनता पक्षाने जणू चारित्र्यहीन लोकांसाठी वेगळं आरक्षणच ठेवलेलं दिसत आहे. प्रचार यंत्रणेतीलच प्रमुख व्यक्ती जर महापालिकेच्या टेंडरमधून मिळालेला पैसा डान्सबारमध्ये उडवत असेल, तर अशा पक्षाने तिकीट दिलेल्या उमेदवारांकडून नेमकी काय अपेक्षा ठेवायची, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. धंगेकरांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून भाजपची चांगलीच कोंडी झाल्याचं चित्र आहे. धंगेकर यांनी आपल्या आरोपांना अधिक धार देताना पुण्यातील प्रभाग क्रमांक 12 चा थेट उल्लेख केला आहे. या प्रभागात भाजपकडून उमेदवारी दिलेल्या एका महिला उमेदवाराच्या पतीचा कथित व्हिडीओ व्हायरल झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. या व्यक्तीवर शिवाजीनगर मतदारसंघातील एका आमदारांचे सर्व आर्थिक व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्या माध्यमातून कमावलेल्या पैशातून बारबाळांसाठी स्वतंत्र कोटा ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप धंगेकरांनी केला. अशा प्रकारच्या आरोपांमुळे निवडणुकीच्या तोंडावर भाजपची प्रतिमा धोक्यात आल्याचं बोललं जात आहे.

## थायलंडमध्ये धावत्या रेल्वेवर कोसळला क्रेन

### रेल्वेने घेतला पेट, २२ जणांचा मृत्यू



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

थायलंडमध्ये एका रेल्वेवर क्रेन पडल्याने आज (बुधवार) सकाळी झालेल्या अपघातात २२ जणांचा मृत्यू तर ३० हून अधिक जण जखमी झाले आहेत. थायलंड मधील सिखिओ जिल्ह्यात हा अपघात झाला. हाय स्पीड रेल्वे लाइनचे काम सुरू असताना बांधकाम क्रेन एका रेल्वेवर कोसळली.

रेल्वेच्या एका डब्यावर क्रेन पडल्यानंतर रेल्वे डब्याला आग लागली. त्यात २२ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. थायलंडची राजधानी बँकॉकपासून २३० किमी अंतरावर हा अपघात झाला आहे. थायलंडमधल्या नाखोन रतचासिमा प्रांतात हा अपघात झाला.

थायलंडमधील सिखिओ जिल्ह्यातून रेल्वे जात असताना हा अपघात झाला आहे. थायलंडची राजधानी बँकॉकपासून २३० किमी अंतरावर ही घटना घडली आहे. घटना घडली त्या ठिकाणी हाय स्पीड रेल्वे लाईनचे काम सुरू होते. दरम्यान, रेल्वेच्या डब्यावर क्रेन पडल्यानंतर रेल्वे रूळावरून घसरली.

या अपघातात २२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ३० हून अधिक प्रवासी या अपघातात जखमी झाले आहेत.

घटनास्थळी मदतकार्य सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच जखमींना रूग्णालयात दाखल केले जात आहे. रेल्वे रूळावरून घसरल्यानंतर रेल्वेने पेट घेतला. आग विझवण्याचे काम सुरू असल्याची माहिती स्थानिक वृत्तसंस्थांनी दिली आहे.



# सोनालिका ट्रॅक्टर्स : 'जीतने का दम'ची गौरवशाली ३० वर्षे पूर्ण

## दूरदृष्टी, धैर्य आणि कटिबद्धतेचा वारसा



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारत हा दूरदृष्टीने उद्योगांमध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या आणि भारतीय उत्कृष्टतेला जागतिक व्यासपीठावर नेणाऱ्या दूरदर्शी नेत्यांचे वरदान लाभलेला देश आहे. सोनालिका ट्रॅक्टर ही या भावनेचे शक्तिशाली असे आधुनिक मूर्त स्वरूप आहे, कारण जिंकण्याची ऊर्मी ('जीतने का दम') या चिरस्थायी श्रद्धेने प्रेरित असलेल्या शेतकऱ्यांसोबत भागीदारीतील विश्वासाचे ३० वर्षे हा ब्रँड साजरा करत आहे.

सोनालिकाचा ३ दशकांचा उल्लेखनीय प्रवास म्हणजे एक अपवादात्मक आणि प्रेरणादायी अशी भारतीय यशोगाथा आहे -ही यशोगाथा होशियारपूर या छोट्या शहरात सुरू होऊन जागतिक स्तरावर १.१ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या ट्रॅक्टर व्यवसायापर्यंत झेपावली आहे. भारतातील सर्वात मोठ्या कंपन्यांच्या फॉर्च्यून ५०० यादीतही तिचा समावेश झाला आहे. आज सोनालिका भारतातील क्रमांक १चा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असून भारतातील तिसरी सर्वात मोठी ट्रॅक्टर उत्पादक कंपनी आहे - ही जगातील सर्वात मोठी ट्रॅक्टर बाजारपेठ आणि जागतिक स्तरावर पाचवी सर्वात मोठी ट्रॅक्टर ब्रँड आहे.

सोनालिकाची कहाणी ही एका कुटुंबाच्या दूरदृष्टीची कहाणी आहे. तिचे संस्थापक आणि अध्यक्ष श्री. एल. डी. मित्तल यांनी या कंपनीचे नेतृत्व केले आहे. 'जीतने का दम' - अधिक शक्ती, अधिक विश्वासार्हता, अधिक प्रतिष्ठा आणि विशेषतः भारतीय परिस्थितीसाठी डिझाइन केलेले तंत्रज्ञान यांवर भारतीय शेतकऱ्यांचा हक्क आहे,

हेवी-ड्युटी आणि कस्टमाइज्ड ट्रॅक्टरची मागणी वाढत असताना, कमी व्हॉल्यूममुळे विक्रेते सुरुवातीला खोलवरचे बदल करण्यास कचरत होते. उपाध्यक्ष डॉ. ए.एस. मित्तल यांच्या नेतृत्वाखाली, सोनालिकाने २०११ पासून इंजिन, ट्रान्समिशन, गिअरबॉक्स, शीट मेटल आणि की ॲग्रीगेट्सचे अंतर्गत उत्पादन सुरू करून अंतर्गत क्षमता निर्माण केली.

या व्हर्टिकल इंटिग्रेशनमुळे उच्च अश्वशक्तीचे ट्रॅक्टर नियमित करण्याची आणि एंट्री-लेव्हल मॉडेल्समध्येही मोठे इंजिन, पॉवर स्टीअरिंग, ऑइल-इमर्स्ड ब्रेक्स आणि मल्टी-स्पीड ट्रान्समिशन सादर करण्याची क्षमता सोनालिकाकडे आली. हा ब्रँड आज दक्षिणेकडील भूप्रदेशांसाठी पॅडी स्पेशल महाबली, महाराष्ट्रासाठी छत्रपती आणि राजस्थानसाठी महाराजा असे प्रदेश-विशिष्ट कस्टमाइज्ड ट्रॅक्टर देखील बाजारात आणतो. तसेच शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी ७० पेक्षा अधिक शेती अवजारांची विस्तृत श्रेणी देखील सादर करतो.

वाढत्या मागणीचा विचार करून सोनालिकाने त्यांच्या होशियारपूर प्लांटची उत्पादन क्षमता सुरुवातीच्या दरवर्षी ५०,००० ट्रॅक्टर युनिट्सवरून १ लाख ट्रॅक्टर युनिट्सपर्यंत वाढवली. तरीही मित्तल यांचे स्वप्न खूप मोठे होते. सोनालिकाने २०१७ मध्ये जगातील सर्वात मोठा पूर्णपणे एकात्मिक ट्रॅक्टर उत्पादन प्लांट सुरू केला, त्यात रोबोटिक आणि ऑटोमेटेड, मल्टी-फ्लेक्स असेंब्ली लाईन्सद्वारे दर दोन मिनिटांनी एक ट्रॅक्टर तयार करण्याची क्षमता आहे. आज सोनालिका २०-१२० एचपीमध्ये २००० हून अधिक मॉडेल्स विकसित करते आणि ते देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेला पूरक आहेत. कंपनीने होशियारपूरभोवती एक समृद्ध एमएसएमई परिसंस्था देखील विकसित केली आहे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला आहे आणि जागतिक औद्योगिक केंद्र निर्माण झाले आहे. सोनालिकाचे विस्तृत डीलर आणि सेवा नेटवर्कसुद्धा तेवढेच अविभाज्य असून सामायिक समृद्धी, क्षमता विकास आणि विक्रीनंतरच्या उत्कृष्टतेवर त्याची बांधणी झाली आहे. त्यामुळे खरेदीपासून ते जीवनचक्र सेवेपर्यंत शेतकऱ्यांना अखंड सेवेची हमी मिळते.

व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीपक मित्तल यांच्या नेतृत्वाखाली सोनालिकाचे कस्टमायझेशन तत्वज्ञान जागतिक स्तरावर पसरले. कंपनीने २००४ मध्ये आपला पहिला ट्रॅक्टर निर्यात केला, २०११ मध्ये युरोपमध्ये ट्रॅक्टर निर्यात करणारा तो पहिला भारतीय ब्रँड बनला आणि आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि त्यापलीकडेही त्याचा विस्तार झाला. आर्थिक वर्ष २०१९ मध्ये, सोनालिका भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड म्हणून उदयास आली, सलग सात वर्षांपासून तिचे हे स्थान कायम आहे. सोनालिकाकडे आज निर्यातीत अजिंक्य असा ३०% बाजारपेठेतील हिस्सा आहे, याचाच अर्थ भारतातून निर्यात होणारा प्रत्येक तिसरा ट्रॅक्टर सोनालिकाच्या होशियारपूर येथील कारखान्यातून बाहेर पडतो.

## वेरुळ येथील जगप्रसिद्ध कैलास लेणी बघून चिमुकले भारावले

■ सावरगाव पाट येथील शैक्षणिक सहल उत्साहात



**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्व स्थळांची प्रथम दर्शन माहिती व ज्ञान व्हावे तसेच त्यांच्या प्रती सामाजिक जाणीव निर्माण व्हावी व निसर्गाचे संवर्धन केले जावे यासाठी सावरगाव पाट (ता. अकोले) येथील जिल्हा परिषद प्राथमिक प्रशालेची सहल आयोजित केली होती यावेळी सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी वेरुळ येथील कैलास लेण्यांविषनी कुतुहलाने सविस्तर माहिती मिळविली.

प्रशालेच्यावतीने आयोजित दोन दिवशीय सहलीत २३ मुले आणि २८ मुली असे ५१ विद्यार्थी सहभागी झाले होते तर मुख्याध्यापक पांडुरंग डगळे, सहशिक्षक सबाजी दातीर, बाळासाहेब मुखेकर, अनिल पवार, भगवान सहाने, सचिन गवांदे, श्रीमती राजकमल नवले, श्रीमती अरुणा पवार, श्रीमती प्रणिता सहाणे या शिक्षकांचाही समावेश होता. पहिल्या दिवशी सहलीत सिंदखेड राजा येथील जिजाऊ जन्मस्थळ, सरदार लखोजी जाधवांचा वाडा, लोणार सरोवर बाळापुरचा किल्ला, शेगावचे गजानन महाराज मंदिर त्यानंतर दुसऱ्या दिवशी छत्रपती संभाजीनगर येथील सिद्धार्थ गार्डन , बिबी का मकबरा बघीतल्यानंतर जगप्रसिद्ध वेरुळ येथील कैलास लेणी बघीतली यावेळी बौध्द, हिंदु आणि जैन धर्माची अशी एकूण ३४ लेणी आहेत. कैलास लेणी पाहतांना पाषाणातून कोरलेल्या स्थापत्य कलेचा अद्भुत नमुना बघायला मिळाला. त्याबरोबरच लेण्यांमध्ये धार्मिक सलोख्याचे प्रतिकही बघायला मिळाले. एकाच अखंड खडकातुन वरून खाली एकाच वेळी कोरलेल्या कैलास मंदिराचे विशेष आहे. याबरोबरच येथील विवीध गुंफा व कोरीव लेगी बघीतल्या त्यानंतर वैजापूर मार्गे सहल परत आली.

## अनिल हंबडे यांचे आजाराने निधन

**नवीन नांदेड: (समर्थ गांवकरी)**



विष्णुपुरी येथील शिवसेनेचे गण प्रमुख,अनिल टेन्ट हाऊस विष्णुपुरीचे व ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तथा नांदेड तालुका टेन्ट हाऊस चे (अध्यक्ष) अनिल साहेबराव हंबर्डे यांच्ये हृदयविकाराच्या आजाराने 13 जानेवारी रोजी दुःख निधन झाले, मृत्यू समयी त्यांचे वय- 42 वर्षे होते. त्यांच्या पार्थिव देहावर सकाळी 11 वाजता काळेश्वर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले ,त्यांच्या अकाली निधना बद्दल विष्णूपुरी भागातील नातेवाईक व हंबर्डे मित्र मंडळींकडून हळहळ व्यक्त करण्यात आले,त्यांच्या पश्चात आई व भांवड पत्नी मुलगा मुलगी असा परिवार आहे.

## श्रीगोंदा येथील क्रीडा संकुल खेळाडूसाठी महत्वपूर्ण ठरेल - ना. विखे पाटील

### नूतन शासकीय विश्रामगृहाच्या कामाची पाहणी



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

"ग्रामीण भागातील युवकांमध्ये खूप गुणवत्ता आहे. त्यांना योग्य संधी, सुविधा व व्यासपीठ मिळाले तर ते राज्य व देश पातळीवर चमकदार कामगिरी करू शकतात. अहील्यानगरच्या क्रीडा क्षेत्राची परंपरा सर्व खेळाडूनी आपल्या नैपुण्यातून जोपासली आहे. श्रीगोंदा येथे उभारण्यात येणारे हे क्रीडा संकुल युवकांच्या क्रीडा कौशल्यांना चालना देणारे ठरेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

श्रीगोंदा शहरातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या सर्व सुविधांनीयुक्त क्रीडा संकुलाच्या कामाचे भूमिपूजन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते, माजी मंत्री बबनराव पाचपुते, नगराध्यक्षा श्रीमती सुनीता खेतमाळीस,तहसीलदार सचिन डोंगरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, मुख्याधिकारी पुष्पागंधा भगत, तालुका क्रीडा अधिकारी दिलीप दिघे आदी उपस्थित होते.

सुमारे साडे आठ कोटी रुपयांच्या माध्यमातून पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलाच्या धर्तीवर २ हेक्टर जागेवर क्रीडा विकासाची कामे या ठिकाणी करण्यात येणार आहेत.

क्रीडा संकुलामध्ये मैदाने, धावपट्टी, इनडोअर क्रीडा हॉल, व्यायामशाळा, स्विमिंग पूल, प्रेक्षक गॅलरी, बदलगृहे, प्रकाशव्यवस्था आदी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

### नवीन शासकीय विश्रामगृहाची पाहणी

भूमिपूजन कार्यक्रमानंतर पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी श्रीगोंदा येथील नव्याने उभारण्यात येणाऱ्या शासकीय विश्रामगृहाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी बांधकामाची गुणवत्ता, खोल्यांची रचना, स्वच्छता, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, पार्किंग, सभागृह आदी बाबींची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

## 'भारत के सुपर फाउंडर्स'च्या ट्रेलरचे अनावरण




**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ॲमेझॉनची विनामूल्य व्हिडिओ स्ट्रिमिंग सेवा, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज आगामी उद्योजकांना घडवणारी रियल्टी सिरीज, भारत के सुपर फाउंडर्सच्या ट्रेलरचे अनावरण केले. या सिरीजमध्ये महत्त्वाकांक्षेची चाचणी करण्यात येईल, कल्पनांची छाननी होईल आणि वास्तविक गुंतवणुकीचे निर्णय घेतले जातील. दिनांक 16 जानेवारी 2026 पासून सेवेवर विनामूल्य स्ट्रिमिंग होणाऱ्या या कार्यक्रमात सूत्रसंचालन आणि मार्गदर्शकाच्या भूमिकेत सुप्रसिद्ध सुनील शेट्टी दिसेल. जे स्पष्टता, शिस्त आणि दीर्घकालीन दृष्टीकोनातून तयार होत असलेल्या भारताच्या उद्योजकांच्या भविष्यातील पिढीला पाठिंबा देण्यासाठी उद्योगपतींचे एक नामांकित मंडळ एकत्र आणत आहे. रस्क मीडिया आणि रिकर क्लबद्वारे निर्मित, 'भारत के सुपर फाउंडर्स'ला स्टॉकग्रो आणि लेगसी कलेक्टिव्हसह स्टार्ट अप बँकिंग पार्टनर म्हणून जन स्मॉल फायनान्स बँक, प्रॉडकटीव्हिटी पार्टनर वनप्लस पॅड 3 आणि पेट फूड पार्टनर म्हणून बॉलर्सचे सह-प्रायोजकत्व लाभले आहे.

भारत के सुपर फाऊंडर्स दीर्घकालीन महत्त्वाकांक्षा आणि पायाभूत अंमलबजावणीद्वारे भविष्यातील संस्थापकांसाठी एक व्यासपीठ म्हणून पुढे येते आहे. याच्या ट्रेलरने ₹100 कोटींची गुंतवणूक अधोरेखित केली आहे, जी रिकर क्लबसह आघाडीच्या उद्योगपतींच्या पॅनेलच्या पाठिंब्याने भारतीय उद्योजक रियल्टी सिरीजसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी बांधिलकी आहे. लहान शहरे आणि उदयोन्मुख बाजारपेठांसह संपूर्ण भारतातील उद्योजकांवर लक्ष केंद्रित केले जात आहे, जे वास्तविक गरजा आणि विस्तार करण्यायोग्य हेतूवर आधारित व्यवसाय तयार करत आहेत. ट्रेलरमधून लक्षात येते की 'भारत के सुपर फाउंडर्स' भारतातून उदयास येणाऱ्या कल्पनांसाठी एक शक्तिशाली मंच तयार केला आहे, ज्यामुळे छोट्या शहरांतील संस्थापक म्हणजेच फाऊंडर्स आणि वास्तविक गरजा तसेच प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित व्यवसाय निर्माण करणाऱ्या विविध वयोगटांवरील लोकांवर प्रकाशझोत टाकला जातो. व्यावसायिकांकडून थेट, अनफिल्टर्ड अभिप्रायाला सामोरे जात असताना उद्योजक त्यांच्या कल्पना स्पष्टता आणि दृढनिश्चयाने सादर करतील, प्रमाणित पर्याय आणि अस्सल व्यावसायिक मूलभूत तत्त्वांना प्राधान्य देतील. ट्रेलरमध्ये उच्च-जोखमीच्या निर्णयासह अस्सल, भावनिक क्षण मिसळले आहेत, कारण संस्थापक जोखीम, अडथळे आणि भारतात तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या लवचिकतेबद्दल मोकळेपणाने बोलताना दिसतील. ₹ 100 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा साठा आणि रिकर क्लबद्वारे समर्थित समभाग तसेच कर्ज वित्तपुरवठ्याच्या समकालीन मिश्रणाच्या पाठिंब्याने, ही मालिका स्वतःला एक विश्वासार्ह, उच्च-भागधारक व्यासपीठ म्हणून स्थान देते.

## सांगवडे गावात PRA उपक्रमाचे यशस्वी आयोजन

**सांगवडे(मावळ) : (समर्थ गांवकरी)**

ग्रामपंचायत व पद्मभूषण वसंत दादा पाटील कृषी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने गावात सहभागात्मक ग्रामीण मूल्यमापन (Participatory Rural Appraisal – PRA) उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून गावातील सामाजिक, आर्थिक व कृषीविषयक माहिती संकलित केली. कृषी कन्यांनी गावाचा सामाजिक व संसाधन नकाशा तयार करण्याचे काम केले असून या प्रक्रियेत गावचे माननीय सरपंच रोहन जगताप यांनी स्वतः पुढाकार घेत नकाशा ओळखून देण्यासाठी व काढण्यासाठी मार्गदर्शन केले. रस्ते, पाण्याचे स्रोत, शेती क्षेत्र व सार्वजनिक सुविधा यांची नोंद कृषी कन्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने केली.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन उत्साहात

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**




श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे श्री आनंद महाविद्यालय, पाथर्डी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर (२०२५–२६) चे उद्घाटन मोहटादेवी देवस्थान, पाथर्डी येथे उत्साहात पार पडले. हे शिबिर "शाश्वत विकासासाठी युवक – पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन" या संकल्पनेवर आधारित असून उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मोहटादेवी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. श्रीकांत लाहोटी उपस्थित होते.त्यांनी युवकांशी संवाद साधताना शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत युवकांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. पाणलोट क्षेत्र विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि तंत्रज्ञानाच्या योग्य वापरातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री तिलोक जैन संस्थेचे खजिनदार मा. श्री सुरेशलालजी कुचेरिया होते. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची भावना, श्रमप्रतिष्ठा व सामाजिक जबाबदारी निर्माण होते,असे प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेषराव पवार यांनी शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघटनकौशल्य आणि समाजबदलाची जाणीव निर्माण होईल, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. धीरज भावसार यांनीही मार्गदर्शन केले.

## स्वामी विवेकानंदांचे कार्य युवकांसाठी दिशादर्शक

**पाथर्डी: (समर्थ गांवकरी)**

12 जानेवारी सोमवारी महात्मा गांधी विद्यालय येळी ता.पाथर्डी येथे स्वामी विवेकानंद व स्वराज्य जननी जिजाऊसाहेब यांची जयंती अतिशय उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राजमाता जिजाऊंसाहेब यांना राजकारणाचे व युद्ध नीतीचे बाळकडू लहानपणा पासूनच वडिलांकडून मिळाले. त्यामुळे त्यांचे कार्य संस्मरणीय ठरले. स्वामी विवेकानंदांचे कार्य युवकांसाठी दिशादर्शक असून त्यांनी सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली,असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल बरसमवाड यांनी यावेळी बोलताना केले. विद्यालयातील बडे भक्ती,शेख मुस्कान,पालवे कार्तिक,पोटे साई,थोरे सार्थक,पाखरे आरती,काटकर श्रावणी,बडे अंजली, बडे कार्तिकी,बटुळे माधवी,ढोले धनश्री अशा अनेक विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याविषयी आपले मनोगत सविस्तर व्यक्त केले. तेरा विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊंची वेशभूषा धारण केल्याने कार्यक्रमाला आणखी रंगत आली. विद्यार्थिनीचा उत्साह ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिकंदर शेख होते. त्यांनी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊंच्या कार्य कर्तृत्वाची व जबाबदार नेतृत्वाची माहिती सांगितली.यावेळी पोपट शेलार,प्रदीप ढोले, व लेखिका अर्चना डावखर,अर्चना कराड,अनिता तळेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अर्जुन गायकवाड,अनुमोदन विजयकुमार चव्हाण तसेच आभार ज्येष्ठ शिक्षक रामनाथ दुधलमल सरांनी मानले.

## १७ आणि १८ जानेवारीला लग्नपंचमी नाटकाचा शुभारंभ

■ 'लग्नपंचमी" या धमाल विनोदी नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथे शनिवार, १७ जानेवारीला, रविवार, १८ जानेवारी टिळक स्मारक मंदिर, पुणे आणि बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे होणार



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मराठी रंगभूमीवरची दोन सर्जनशील, संवेदनशील आणि बहुमुखी कलावंत मधुगंधा कुलकर्णी आणि निपुण धर्माधिकारी यांचे अनुक्रमे लेखन व दिग्दर्शन तसेच स्वप्नील जोशी, अमृता खानविलकर यांच्या भूमिका यांमुळे चर्चेत असलेले नवे मराठी नाटक 'लग्नपंचमी'चा शुभारंभाचा प्रयोग पुणे १७ आणि १८ जानेवारीला कोथरूड आणि पुणे येथे पार पडणार आहेत.

मराठी नाट्यसृष्टीत प्रचंड उत्सुकता लागून राहिलेल्या 'लग्नपंचमी' या नाटकाला सातारा, सांगली आणि कोल्हापूर येथे प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाल्या नंतर आता कोथरूड आणि पुणे येथे 'लग्नपंचमी'चा शुभारंभाचा प्रयोग पुणे १७ आणि १८ जानेवारीला कोथरूड आणि पुणे येथे पार पडणार असून त्यानंतर मुंबईत ते जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात होणार आहेत.

कोथरूड आणि पुणे येथे 'लग्नपंचमी' चा शुभारंभाचा प्रयोग शनिवार, १७ जानेवारी , सायं. ५:०० वा.यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड ,रविवार, १८ जानेवारी , दुपारी १२:०० वा.टिळक स्मारक मंदिर, पुणे आणि रविवार, १८ जानेवारी | सायं. ५:१५ वा.बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे होणार आहेत

चित्रपट आणि नाट्यसृष्टीतील उत्तुंग यश मिळविलेले नाट्यकर्मी 'लग्नपंचमी या नाटकाच्या माध्यमातून एकत्र येत असल्याने मराठी रंगभूमीवर आणि रसिकांमध्येसुद्धा कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. मधुगंधा यांचे लेखन व निर्मिती आणि निपुण धर्माधिकारी यांचे दिग्दर्शन व जोडीला स्वप्नील जोशी यांचे तब्बल बारा वर्षांनी रंगभूमीवर होत असलेले पदार्पण यामुळे रसिक या नाटकाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

त्याशिवाय मराठी, हिंदी चित्रपटसृष्टीतील एक ग्लॅमरस चेहरा अमृता खानविलकर या नाटकाच्या माध्यमातून मराठी रंगभूमीवर पदार्पण करत आहे. त्यामुळे या नाटकाची चर्चा सध्या रसिकांमध्ये आहे. या माध्यमातून मराठी रंगभूमीला एक ताजेतवाने, मनमोकळे आणि वास्तववादी नाटक लाभणार आहे, हे नक्कीच.'लग्नपंचमी' हा लग्नातील विरोधाभास, भावना, विनोद आणि नात्यांचा बहुरंगी प्रवास अत्यंत मनमोकळ्या पद्धतीने मांडणारा नवीन मराठी प्रयोग म्हणून या नाटकाकडे पाहिले जात आहे.

स्वप्नील आणि अमृता यांच्यासह या नाटकात सुनील अभ्यंकर, मधुगंधा कुलकर्णी यांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत. 'मयसभा' निर्मित 'लग्नपंचमी'चे नेपथ्य संदेश बेंद्रे, प्रकाश शीतल तळपदे, वेशभूषा पूर्णिमा ओक यांची असून नितीन नाईक सहनिर्माता आहेत. मधुगंधा कुलकर्णी, स्वप्नील जोशी, अमृता खानविलकर आणि तृप्ती पाटील या नाटकाचे निर्माते आहेत.

"नवरा म्हणे 'पंच मी', बायको म्हणे, 'लग्नपंचमी" या टॅगलाईनसह हे नाटक रंगभूमीवर येत आहे.

"जशी रंगपंचमीला रंगांची उधळण होते, तशीच लग्नात भावभावनांची पंचमी असते. लग्न म्हणजे केवळ एका व्यक्तीशी नातं जोडणं नाही... तर त्याच्या अनेक व्यक्तिमत्त्वांशी नातं जोडणं! हे नाटक प्रेक्षकांना नक्कीच भावेल असे मधुगंधा कुलकर्णी म्हणाल्या.

निपुण धर्माधिकारी सांगतात, "लग्न या विषयावर विनोद न ऐकलेला माणूस दुर्मिळ. 'लग्नपंचमी' मधील पात्रे सुखी संसाराचा साधा मंत्र वारंवार विसरतात आणि त्यातून जी गंमत जमत घडते ती यात अनुभवायला मिळणार आहे.

स्वप्नील जोशी म्हणतो, "गेली कित्येक वर्षे मला माझे चाहते जो प्रश्न विचारात होते, की 'तू नाटकात कधी दिसणार', त्याचे उत्तर या नाटकाच्या माध्यमातून मिळते आहे. माझे आवडते लेखक, दिग्दर्शक माझ्याबरोबर आहेत आणि माझी मैत्रीण अमृता नाटकात प्रमुख भूमिकेत आहे. त्यामुळे एक उत्तम प्रयोग या निमित्ताने रसिकांना अनुभवायला मिळणार आहे." अमृता या नाटकाबद्दल बोलताना म्हणाली, "या नाटकाच्या तालमी करताना आम्हाला खूप मजा येते आहे.

# स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

■ आजच्या विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद एक प्रेरणास्त्रोत : डॉ. आनंद शितोळे



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांचे कार्य व विचार आजच्या युवकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत असे अहिल्यानगर येथील प्रसिद्ध व्याख्याते आनंद शितोळे यांनी प्रतिपादन केले. पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी येथे भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानाचा ध्वज सातासमुद्रापार फडकवणारे युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी आनंद शितोळे म्हणाले, की राजमाता जिजाऊ यांनी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले व ते सत्यात उतरवण्यासाठी आपले पुत्र छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले. राजमाता जिजाऊच्या कार्यशैली व विचारावर छ. शिवरायांनी मुठभर मावळे घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापन केले. राजमाता जिजाऊ यांचे विचार आजही सर्व समाजासाठी प्रेरक व प्रेरणादायी ठरले आहे. तसेच भारतीय संस्कृतीचा ध्वज सातासमुद्रापार फडकवणारे स्वामी विवेकानंद यांनी भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञान जगासमोर मांडले. स्वामी विवेकानंद यांनी प्रत्येक मानवाचा धर्म स्पष्ट केला. प्रत्येक मानवाने आपली संस्कृती व धर्म/कार्य पाळला तर राष्ट्र सर्वश्रेष्ठ उंचीवर जाऊ शकतो, असा विचार स्वामी विवेकानंदांनी प्रत्येक मानवाला दिला तसेच आजच्या युवकांसाठी स्वामी विवेकानंद एक प्रेरणास्त्रोत आहेत. स्वामी विवेकानंदांच्या जीवन कार्यावर आणि त्यांच्या कर्मयोग सिद्धांतावर प्रकाश टाकला. यावेळी स्वामी विवेकानंदांचे अनेक प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा सादर करून वातावरण उत्साही केले. अनेक विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार आपल्या भाषणात व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शरद मेढे यांनी केले. सूत्रसंचालन रेश्मा सातपुते यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर गायके यांनी मानले.



ठाणे : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 साठी दापोली विधानसभेचे माजी आमदार सूर्यकांत दळवी माजी आमदार श्री . सुभाषी भोईर, काजू महामंडळ संचालक महाराष्ट्र प्रदेश रुपेश बेलोसे यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा ठाणे जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस शशिकांत (सतीश) केळशीकर यांच्या नेतृत्वात दिवा शहरातून महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले यावेळी कोकण प्रतिष्ठानचे व दापोली, खेड, मंडणगडचे भागातील तुषार गायकर, गणेश दवन्डे, वैभव मिसाल, योगेश भुरटे, सुरेश शिगवण, परेश पारदले, दिलीप शिगवन, प्रमोद चव्हाण, रमेश पायकोळी, रोशन शेळके यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...

### शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली भव्य बाईक रॅली

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरात शिंदे शिवसेनेकडून प्रचाराच्या शेवटच्या दिवशी अविस्मरणीय दुचाकी महारॅली काढण्यात आली. प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने शिवसनेचे दिवा शहरप्रमुख व उमेदवार रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक २८ मधील संपूर्ण विभागात दुचाकी रॅली काढण्यात आली. प्रसंगी शेकडो दुचाकीस्वार भगवे झेंडे लावून शक्ती प्रदर्शन करण्यात आले. दिवा शहरातील दातीवली गावातून सदर रॅली प्रभाग २८ मध्ये शहरप्रमुख व उमेदवार रमाकांत मढवी यांच्यासह इतर उमेदवार शेकडो दुचाकी स्वारंसह निवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस असल्याने सहभागी झाले होते. सदर रॅली दातीवली गाव, म्हातर्डी, बेतवडे, आगासन, बेडेकर नगर, गणेश पाडा, दिवा स्टेशन रोड अशी काढण्यात आली. सन २००७ सालापासून म्हणजेच गेल्या १८ वर्षापासून प्रत्येक सुख-दुःखात खंबीरपणे तुमच्यासोबत उभा असून माझ्यासाठी दिवा हे फक्त एक 'शहर' नाही, माझं 'घर' आहे आणि तुम्ही माझं कुटुंब आहात. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून मी जनसेवेच हे कार्य अविरतपणे करत असून महापूर, कोरोनाचं संकट, तुमचा हा रमाकांत मढवी कधीच घराचे दरवाजे बंद करून बसला नाही, तर मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्याने नेहमीच ढाल बनून मी काम करत असल्याचे मढवी यांनी स्पष्ट केले. दिव्याच्या चिखलमुक्तीपासून ते रेल्वे स्थानकाच्या कायापालटापर्यंत आपण बरंच काही साध्य केलंय, पण भविष्यातील स्वप्नं अजून मोठी आहेत. म्हणूनचं प्रभाग क्र. २८ मधून महायुतीचा अधिकृत उमेदवार म्हणून पुन्हा एकदा आपल्या सेवेसाठी मी उभा आहे आम्हांला पुन्हा एकदा आपल्या सेवेची संधी द्या. तुमचा विश्वास हीच माझी खरी संपत्ती असल्याचे रमाकांत मढवी यांनी बोलताना स्पष्ट केले.



### दिव्यात ठाकरे शिवसनेच्या उमेदवारांचे भव्य रॅली काढून शक्ती प्रदर्शन

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार ज्योती राजकांत पाटील, अँड. रोहिदास मुंडे व योगेश निकम यांनी भव्य रॅली काढून दिवा शहरात शेवटच्या दिवशी शक्ती प्रदर्शन केले. प्रसंगी ठाकरे शिवसनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह शेकडो सदर रॅलीत सहभागी झाले होते.शिवसेनेचे उपनेते नितीन बानगुडे पाटील, उपनेते व कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत,ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, कल्याण लोकसभा सहसंपर्कप्रमुख संतोष जाधव, जिल्हा संघटक अभिजीत सावंत, युवा जिल्हा अधिकारी प्रतीक पाटील यांच्या उपस्थितीत हा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला पहिल्या वर्षात हॉस्पिटलचे आश्वासन दिवा शहरातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी निवडून आल्यानंतर पहिल्या वर्षातच सुसज्ज हॉस्पिटल सुरू करण्याची हमी देण्यात आली आहे. जोपर्यंत हक्काची जागा मिळत नाही, तोपर्यंत भाडेतत्त्वावर जागा घेऊन माता-भगिनींसाठी प्रसूती कक्ष आणि लहान मुलांसाठी अतिदक्षता विभाग (ICU) तातडीने सुरू केला जाईल. तसेच, पहिल्या सहा महिन्यांत 'महास्वच्छता अभियान' राबवून ड्रेनेज आणि कचऱ्याची समस्या मुळापासून उपटून टाकण्याचे आश्वासन दिले आहे. पाणी माफियांची दादागिरी संपवणार अधिकृत नळ कनेक्शन देणार दिवा शहरातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र साठवण टाकी उपलब्ध करून दिली जाईल.



ठाणे : ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या निवडणूक चिन्ह असलेल्या सिलेंडर गुलकचे वाटप करण्यात आले. जनतेशी थेट संवाद साधणारा एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. वाढती महागाई, गॅस दरवाढ आणि सामान्य कुटुंबांवरील आर्थिक ताण याकडे लक्ष वेधण्यासाठी घराघरात जाणारा सामाजिक–आर्थिक वास्तवाचा संदेश देणारा ठरला आहे. स्वयंपाकघरातील सिलेंडर हा प्रत्येक कुटुंबाच्या जीवनाशी जोडलेला विषय असल्याने महिलांमध्ये या उपक्रमाबाबत विशेष चर्चा व सकारात्मक प्रतिसाद पाहायला मिळाला. प्रभाग क्र. २७ व २८ मधील नागरिकांनी या वेगळ्या आणि आशयपूर्ण प्रचार पद्धतीचे स्वागत केले. सत्ताधाऱ्यांच्या जनविरोधी धोरणांमुळे निर्माण झालेल्या महागाईविरोधात जनजागृती करणे व सामान्य माणसाच्या प्रश्नांना केंद्रस्थानी आणणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ)

# हिवरगाव येथे शाळेत बिबट्याविषयी जनजागृती धडे

**डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील हिवरगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून हिवरगाव ग्रामपंचायत व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बिबट्याविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात Wildlands Conservation Foundation, नागपूरचे संचालक अजिंक्य भांबुरकर यांनी विद्यार्थ्यांना बिबट्याच्या सवयी, वर्तन व सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास वनपाल ढोनर साहेब, श्रीमती एम. जे. तांबे, कु. एस. टी. डगळे, एम. एल. सदगीर, एस. पी. गोडे, एस. पी. नाडेकर तसेच वनरक्षक थोरात, काळे, पालेकर यांच्यासह वन समितीचे सदस्य उपस्थित होते.

मार्गदर्शनात अजिंक्य भांबुरकर यांनी बिबट्याबाबत असलेले गैरसमज दूर करताना सांगितले की, "या पृथ्वीवर प्रत्येक प्राण्याला जगण्याचा अधिकार आहे." वाढती मानवी लोकसंख्या आणि तुलनेने घटत जाणारी वन्यजीव संख्या यामुळे मानवी-वस्ती आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. पुणे, नाशिक व अहिल्यानगर परिसरात बिबट्यांची संख्या अधिक असल्याने काही बिबटे गुजरात येथील वनतारा येथे स्थलांतरित करण्याचा विचार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बिबटा उन्हाळ्यात कमी दिसतो; पावसाळा व हिवाळ्यात ऊस, गिनी गवत, मका आदी पिकांत लपण्यासाठी जागा मिळाल्याने अधिक आढळतो.

उन्हाळ्यात तो नदीपात्रालगत राहतो; उष्णता सहन होत नाही.रात्री बिबट्याची दृष्टी मानवापेक्षा सुमारे १० पट जास्त असते. उभे असताना तो सहसा हल्ला करत नाही; खाली वाकल्यास धोका वाढतो. शेतीकाम करताना गळ्यात स्कार्फ/मफलर गुंडाळावा. मुलांनी सायंकाळी बाहेर खेळू नये; जनावरांचे गोठे बंदिस्त ठेवावेत. रात्री फिरताना काठी, शिट्टी, मोबाईल ठेवावा व मोठ्याने बोलावे—यामुळे बिबटा दूर जातो.

अचानक समोर दिसल्यास पाठ न करता हळूहळू मागे सरकावे, अंतर वाढवावे.

भांबुरकर यांनी काही विद्यार्थ्यांना पुढे बोलावून प्रत्यक्ष कृती करून दाखवली तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता ठुबे, शिक्षक वाकचौरे सर, गिर्हे सर, मुठे सर, मोरे मॅडम; न्यू इंग्लिश स्कूल हिवरगाव आंब्रेचे मुख्याध्यापक गुंजाळ सर यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होता. ग्रामपंचायत सरपंच शांताबाई मेंगाळ, उपसरपंच अमोल ठुबे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष नाईकवाडी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपसरपंच अमोल अशोकराव ठुबे यांनी विशेष प्रयत्न केले.

# उपनगराध्यक्षपदी सातभाई तर तिघांची स्वीकृत नगरसेवक पदी निवड

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

राहुरी नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी विकास आघाडीचे गजानन भागवत सातभाई यांची आज बिनविरोध निवड झाली असून स्वीकृत नगरसेवक पदी विकास आघाडीचे डॉ. संतोष चंद्रकांतउदावंत अँड. राहुल भैया महेंद्र शेटे तर विरोधी परिवर्तन आघाडी कडून नयन नवनित शिंगी यांची निवड करण्यात आली. उपनगराध्यक्ष पदासाठी सकाळी ११ वाजता मुख्याधिकारी अभिजित हराळे उपस्थितीत प्रक्रिया सुरू झाली १ वाजे पर्यंत एकच अर्ज दाखल झाला. गजानन सातभाई यांचा अर्ज दाखल झाला सूचक म्हणून गटनेता हर्ष तनपुरे होते. दुपारी दीड वाजता उपनगराध्यक्ष म्हणून गजानन भागवत सातभाई यांची निवड यावेळी जाहीर करण्यात आली. नामनिर्देशित सदस्य पदासाठी अर्थात स्वीकृत नगरसेवक पदासाठी विकास आघाडी कडून डॉ. संतोष चंद्रकांत उदावंत व अँड. राहुल महेंद्र शेटे यांची निवड जाहीर करण्यात आली, तर विरोधी परिवर्तन आघाडी कडून नयन नवनीत शिंगी यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी सहाय्यक म्हणून भूमिका पार पाडली. यावेळी सत्ताधारी गटाचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे ,आघाडीचे गटनेता हर्षअरुण तनपुरे ,जेष्ठ नगरसेविका डॉक्टर उषाताई तनपुरे ,विरोधी भाजपाचे गटनेता राजेंद्र उर्फ चंद्रकांतडंडे ,नगरसेवक प्रतीक रावसाहेब तनपुरे , प्रशांत विजय डौले , प्रदीप भुजाडी , चेतन पोपळघट , सोन्याबापू जगधने , अविनाश मस्के सर, अरुण साळवे , संगीता शहाजी जाधव ,लता बाळू जाधव ,वृषाली नंदकुमार तनपुरे,आसमा आरिफ शेख , प्रियंका अमोल काशीद , सिंधुबाई सुभाष डावखर , प्रसन्न राजेंद्र वराळे, मनीषा संतोष बर्डे तसेच विकास आघाडी व भाजपा यांचे कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुर्भे पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

तुर्भे पोलीस ठाणे यांच्या वतीने नागरिकांसाठी दिलासादायक अशी मोठी कामगिरी करण्यात आली आहे. भारत सरकारच्या CEIR पोर्टल च्या प्रभावी वापरातून चोरीस गेलेले अथवा हरवलेले एकूण १०० मोबाईल फोन हस्तगत करून ते मूळ मालकांना सन्मानपूर्वक परत करण्यात आले आहेत. या मोबाईल फोनची एकूण किंमत रु. २०,२७,१८६/- इतकी आहे.

नागरिकांचे मोबाईल चोरीस गेल्यास अथवा हरवल्यास तक्रार नोंदविण्यासाठी केंद्र सरकारने CEIR पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून तुर्भे पोलिसांनी भारतातील विविध राज्यांतून विविध कंपन्यांचे मोबाईल शोधून काढत त्यांची यशस्वी हस्तगत केली. ही कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे, मा. सह पोलीस आयुक्त श्री. संजय येनपुरे, मा. पोलीस उपायुक्त श्री. पंकज डहाणे तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. आदिनाथ बुधवंत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तुर्भे पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. आबासाहेब पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सतीश चाबुकस्वार, पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री. गजानन कदम, पोलीस उपनिरीक्षक श्री. निलेश बारसे व पोलीस नाईक रोहित राठोड (ब.क्र. ३१६६) यांनी या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली.



■ CEIR पोर्टलच्या मदतीने २०.२७ लाखांचे १०० चोरीस गेलेले मोबाईल नागरिकांना परत!

# जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत आयोजित वांगदरी केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांत जि. प. प्रा. शाळा वांगदरी जुनीचे घवघवीत यश

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत आयोजित वांगदरी केंद्रस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा (सन २०२५–२६) जि. प. प्राथमिक शाळा, वांगदरी जुनी येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये जि. प. प्राथमिक शाळा, वांगदरी जुनी येथील विद्यार्थ्यांनी सर्वच खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले असून त्यांची पुढील बीटस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या केंद्रस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन श्रीगोंदा तालुक्याचे युवा नेते श्री. दिग्विजय राजेंद्र नागवडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी वांगदरी गावचे सरपंच श्री. तुषार नागवडे हेही उपस्थित होते.

सांघिक खेळांमध्ये मुले (कबड्डी) या स्पर्धेत जि. प. प्रा. शाळा, वांगदरी जुनी संघाने विजय मिळवला. तसेच मुली (खो-खो) स्पर्धेतही वांगदरी जुनी संघाने विजयी बहुमान पटकावला. मुलांच्या कबड्डी व मुलांच्या खो-खो या दोन्ही स्पर्धांमध्ये वांगदरी केंद्रातील सर्व शाळांमधून जि. प. प्रा. शाळा, वांगदरी जुनी संघ विजयी ठरला.

वैयक्तिक खेळांमध्ये मुले उंच उडी स्पर्धेत अर्षद रफिक सय्यद याने तृतीय क्रमांक पटकावला. मुली उंच उडी स्पर्धेत खुशी दत्तात्रय कांबळे हिने प्रथम क्रमांक मिळवला. मुले लांब उडी स्पर्धेत अर्षद रफिक सय्यद याने तृतीय क्रमांक, तर मुली लांब उडी स्पर्धेत खुशी दत्तात्रय कांबळे हिने प्रथम क्रमांक पटकावला. ५० मीटर धावणे स्पर्धेत मुले व मुली गटामध्ये अनुक्रमे अर्षद रफिक सय्यद व खुशी दत्तात्रय कांबळे यांनी प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या यशात भर घातली.

सर्व विजयी संघांसाठी शिक्षणप्रेमी श्री. कमलाकर गोरे यांच्या वतीने रुपये दहा हजार किमतीच्या ट्रॉफींचे सौजन्य शाळेस देण्यात आले. तसेच वैयक्तिक स्पर्धेमधील सर्व विजेत्यांसाठी आदरणीय श्री. राहुल उबाळे सर यांच्यातर्फे मेडल्स सौजन्य देण्यात आले.शाळेच्या वतीने दोघांचेही मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय सौ. प्रतिभा दिलीप नागवडे मॅडम तसेच सहशिक्षक श्री. नितीन दादासाहेब शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशामध्ये श्री अविनाश उबाळे , श्री महादेव भालेराव श्री निखिल कांबळे, श्री सतीश दिवेकर (मंडप सौजन्य) श्री. चेतन मधुकर राऊत, श्री. शब्बीर पठाण, श्री. कल्पक राऊत सर, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर युवा प्रतिष्ठान वांगदरी जुनी, श्री तुषार भगत (फिल्टर पाणी सौजन्य),ग्रामपंचायत वांगदरी, सौ. सोनाली श्रीकृष्ण नागवडे (अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती), तसेच सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मुख्यमंत्री सडक योजनेतील रस्ते कामात कोट्यवधींचा घोटाळा

## ठिकठिकाणी निकृष्ट रस्ते, ग्रामस्थांचा उग्र इशारा!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री सडक योजना अंतर्गत अकोले तालुका, जिल्हा अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या गाव-जोड वाडी-जोड रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जा व आर्थिक अपहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे हा असताना, प्रत्यक्षात ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांनी कामाऐवजी बिले कशी अदा होतील यावरच भर दिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

अकोले तालुक्यातील गर्दनी–बारामती रोड ते मुख्य रस्ता, पिंपळगाव निपाणी ते तालुका हद्द, लिंगदेव–धुपे, हिवरगाव गणोरे–खातोडे वस्ती, वाघजाळी–ई जीमा २७, मोरेवाडी–खैरदरा, सांगडेवाडी–कुरकुंडी, कोठेबु–वनकुटे, ई जीमा १८–बहिरवाडी असे अनेक रस्ते प्रगतीपथावर असल्याचे दाखवले जात असले, तरी प्रत्यक्ष काम मात्र अत्यंत तोकडे असल्याचा आरोप आहे.

प्राथमिक माहितीनुसार मार्च २०२५ मध्ये प्रत्यक्ष काम न करता खोदकाम, भरावा, खडीकरण, सिमेंट कॉंक्रीट आदी कामांची खोटी नोंद करून अंदाजे ५ कोटी रुपये आगाऊ स्वरूपात अदा करण्यात आले. प्रत्यक्षात खोदकाम व भराव अत्यल्प प्रमाणात झाल्याने रस्त्यांची रुंदीकरण, चढ-उतार व वळण सुधारणा झालीच नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

GSB कमी जाडीचे दाखवून पूर्ण बिल अदा करण्यात आले. ड्रायलीन कॉंक्रीटमध्ये निकृष्ट खडी, जास्त फ्लाय अँश व कमी सिमेंट वापरल्याने दर्जा ढासळला आहे. परिणामी अनेक ठिकाणी ड्रायलीन कॉंक्रीट उखडलेले दिसून येते. कॉंक्रीट रस्त्याचा अंतिम थर PQC मध्येही कमी प्रतीचे सिमेंट, निकृष्ट वाळू व खडी वापरल्याने तीन महिन्यांतच संपूर्ण रस्त्यावर तडे पडले आहेत. या गतीने काम राहिल्यास रस्ते दोन वर्षांतच पूर्णपणे खराब होतील, असा इशारा देण्यात आला.

सर्व कामांची तपासणी गुणनियंत्रण, नाशिक विभाग यांच्याकडून करून घेतल्यानंतरच पुढील कामे सुरू करावीत.

या प्रकरणी माजी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव दराडे यांनी तीव्र इशारा देत सांगितले की, निकृष्ट व बोगस कामे थांबवली नाहीत तर प्रत्येक ठिकाणचे ग्रामस्थ स्वतः पोकलेन/जेसीबी लावून रस्ते उखडून टाकतील. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन गुणवत्तापूर्ण काम सुनिश्चित करावे, अन्यथा आंदोलन अटळ असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**ग्रामस्थांच्या मागण्या:**

**ग्रामस्थांनी मागणी केली आहे की, खराब झालेला अंतिम थर (PQC) पूर्णपणे काढून नव्याने कॉंक्रीट करावे. ज्या ठिकाणी GSB झालेले नाही किंवा ड्रायलीन निकृष्ट आहे, त्या कामांचे पेमेंट ठेकेदारांना अदा करू नये.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अँड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# दोनशे वर्षांहून अधिककाळ सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रा

- ग्रामीण संस्कृतीचे दर्शन, अर्थकारणाचा संगम, करोडोंची उलाढाल

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठी मुरबाड तालुक्यातील म्हसा गावची 'म्हसा जत्रा' प्रसिद्ध समजली जात असून ,सद्या म्हसा जंत्रेत गर्दीला उधाण आले असून महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा एक मोठा उत्सव, जिथे व्यापार, श्रद्धा आणि संस्कृती यांचा मेळ साधला जात असून ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, मुंबई, पालघर यांसारख्या जिल्ह्यांतून तसेच शेजारच्या राज्यांमधूनही लाखो भाविक आणि व्यापारी म्हसा जत्रेत दाखल झाले आहेत. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील म्हसा गावात खांबलिंगेश्वर (म्हसोबा) देवाच्या नावाने ही जत्रा भरते. दरवर्षी पौष पौर्णिमेला (जानेवारी महिन्यात) या यात्रेला सुरुवात होते. साधारणपणे १५ ते २० दिवस ही जत्रा सुरू असते. तर सद्या जत्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या लांबच, लांब रांगा पाहायला मिळत आहेत. तर दोनशे वर्षांहून अधिककाळ पारंपरिक स्वरूपात सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रा असून, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन, अर्थकारणाचा संगम, करोडोंची उलाढाल म्हसा जत्रेतून पाहायला मिळत आहे.तर अनेक युट्यबर म्हसा जत्रेत दाखल झाले असून,सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रेचे अनेक व्हिडिओ सद्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. म्हसा परिसरात शेतात,माळरानावर चुलीवरचे पारंपरिक पद्धतीने रात्रीचे जेवण करतांना भाविक दिसून येत आहेत.

ही यात्रा ग्रामीण संस्कृती, श्रद्धा आणि अर्थकारणाचा संगम आहे, जिथे करोडोंची उलाढाल होत असते. म्हसा जत्रेत य घोंगड्या, ब्लँकेट, चादरी, चिनी मातीची बैल जोडी, खेळणी, मिठाई, खाजा, पेढे आणि इतर अनेक वस्तूंची दुकाने असतात. सद्या हिवाळ्याचे दिवस असून, मोठ्या प्रमाणात घोंगड्या , ब्लँकेट,स्वेटर, चादरींची मोठ्या प्रमाणात मागणी दिसून येत असून, नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. तर याच साहित्यासाठी म्हसा जत्रा प्रसिद्ध समजली जाते. शिवाय बांबूच्या टोपल्या, झाडाच्या खोडापासून तयार केलेला उखळ, कोयते, कुदळ, विळे असं शेतीला उपयोगी पडणाऱ्या साहित्याची मोठ्या प्रमाणात शेतकरी खरेदी करताना दिसत आहे.म्हशाच्या जत्रेत मिळणारे हातोळी खाजा, गुलाबजामुन हे गोड पदार्थही मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध असून, गोड पदार्थ खाण्यासाठी देखिल नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. दोनशे वर्षाहून अधिक ही म्हसा यात्रा आजपर्यंत निरंतर चाललेली आहे असे ज्येष्ठ नागरिकांचे म्हणणे आहे. यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे शेकडो वर्षांपासून चालत आलेला बैल बाजार, जिथे महाराष्ट्रासह इतर राज्यांमधूनही लाखोंच्या संख्येने शेतकरी बैल खरेदी-विक्रीसाठी येतात, तसेच विविध वस्तूंची दुकाने, खेळणी आणि मनोरंजनाचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. म्हसा जत्रा या काळात मोठ्या प्रमाणावर होणारी भाविकांची गर्दी आणि वाढत्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने वाहतूक नियंत्रणासाठी विशेष उपायोजना राबविण्यात येत आहेत. ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या प्रस्तावावरून जारी करण्यात आलेल्या या आदेशानुसार, जत्राकाळात काही प्रमुख मार्गांवर वाहने थेट प्रवेश करू शकणार नाहीत, तर वाहतूक सुरक्षितपणे वळविण्यासाठी पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाला विशेष अतिथी म्हणून येवलीचे सरपंच यांना आमंत्रित

**तामसा : (समर्थ गांवकरी)**





ग्रामपंचायत येवली तालुका हदगाव जिल्हा नांदेड येथील सरपंच शितल गजानन कंठाळे व त्यांचे पती गजानन मारुती कंठाळे यांना दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. दि.७ जानेवारी २०२६ रोजी पंचायत राज विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र मिळाले असून महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यातील सरपंच व सरपंच प्रतिनिधी म्हणून जाणार आहेत त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातून येवली येथील सरपंच शितल गजानन कंठाळे यांची निवड झाल्यामुळे त्यांना दिल्ली येथे दि.२४ जानेवारी ते २६ जानेवारी पर्यंत कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून निवड झालेली आहे. त्या येवली गावच्या सरपंच असून तसेच हदगाव तालुका सरपंच संघटना उपाध्यक्ष आहेत व यशदा प्रवीण प्रशिक्षक म्हणून ते नांदेड जिल्ह्यामध्ये काम करत असतात . पंजाब येथील पाचशे महिला सरपंच नांदेड येथील ग्रामपंचायतच्या अभ्यास दौऱ्यासाठी आले असता जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडून समन्वयक निवड करण्यात आली होती त्यामध्ये सरपंच शितल गजानन कंठाळे यांनी निशुल्क उत्कृष्ट काम केले आहे . अतिवृष्टी मुळे शेतकऱ्याचा अतोनात नुकसान झाले होते त्यामुळ त्यांनी आपले सहा महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये दिले. तसेच येवली गावांमध्ये आरोग्य शिबिर, कराटे शिबिर, योग शिबिर, स्वच्छता शिबिर, महिला सक्षतीकरण शिबिर, व्यसनमुक्त गाव, प्लास्टिक मुक्त गाव, हरित गाव व शालेय शिक्षण यासाठी अहोरात्र काम करत आहेत गावांमध्ये वेगवेगळ्या योजनेतून शि.शि.रस्ते ,बंदिस्त नाली, पेअर ब्लॉक रस्ते, अंगणवाडी बांधकाम, शाळा बांधकाम, सभा मंडप बांधकाम, पाणीपुरवठा विषयक कामे,असे विविध उपक्रम व कामे करून गावाचा विकासासाठी काम करत आहेत.

# शनी शिंगणापूर येथे भाविकांची पिळवणूक करणाऱ्या एजंटांवर (लटकू) प्रतिबंधात्मक कारवाई

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



शनिशिंगणापूर (ता. नेवासा) येथे देशभरातून येणाऱ्या भाविकांची एजंटांकडून (लटकू) होणारी आर्थिक पिळवणूक, फसवणूक व असुविधा रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरचे उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १५२ (१) (a) अन्वये शिंगणापूर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

शनिशिंगणापूर हे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, शनिशिंगणापूर पोलीस ठाणे आणि नेवासा तहसीलदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मंदिर परिसर तसेच गावाच्या बाहेरील रस्त्यांवर काही खासगी व्यक्ती (एजंट/लटकू) भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानांतूनच चढ्या दराने पूजा साहित्य खरेदी करण्यास भाग पाडतात. भाविकांनी यास विरोध केल्यास त्यांना दमदाटी व शिवीगाळ केली जाते. सन २०२५ मध्ये अशा प्रकारच्या ५३ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या प्रकारांमुळे भाविकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

# आचारसंहिता भंगाच्या ८ तक्रारी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणूक प्रचारादरम्यानची आचारसंहिता भंग होत असल्याच्याबिबट्या एकूण आठ तक्रारी आचारसंहिता कक्षाकडे प्राप्त झालेल्या आहेत. या तक्रारींच्या चौकशीमध्ये कारवाई करत रोख रक्कम पकडल्याचा एक गुन्हा भरारी पथकाने पोलिसांकडे दाखल केला आहे. दरम्यान पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाने आत्तापर्यंत सुमारे ३८ लाख रुपये किंमतीची अवैध दारू जप्त करण्याची कारवाई केली आहे. दरम्यान उद्या, मंगळवारी सायंकाळी जाहीर प्रचाराची सांगता होत आहे. त्यानंतरच्या कालावधीत आचारसंहिता भंगाच्या अधिक स्वरूपाने तक्रारी प्राप्त होणार असल्याचा अंदाज निवडणूक यंत्रणेतील अधिकारी व्यक्त करत आहेत.

# संस्कार हेच जीवनाचे मूळ उधिष्ठ - गणपत अंबुले

## तीस वर्षांनी भेटले सहकारी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



जीवनात संस्कार हेच सगळ्यात महत्वाचे असून आपण काय करतो याच्या पेक्षा आपल्या पाल्याना आपण काय संस्कार देतो हे महत्वाचे आहे असे प्रतिपादन पारनेर येथील न्यू . इंग्लिश स्कुलचे मा. प्राचार्य गणपत अंबुले यांनी केले . पारनेर येथे तब्बल तीस वर्षांनी सन १९९५-१९९६ दहावीच्या वर्गाचे सस्नेह एकत्रीकरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमेच्या पूजनाने व दीपप्रज्वलन करून करण्यात आली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे माजी प्राचार्य गणपत अंबुले हे होते तर प्रमुख उपस्थितीत शाळेचे माजी प्राचार्य नंदकुमार कोल्हे ,माजी प्राचार्य मुकुंद जासूद , प्रा. सुकदेव ढूस ,प्रा .सिंधू कोल्हे ,प्रा. लता पोटे,शिकतेकर कर्मचारी टी . बी. कोल्हे व गाडगे आदी उपस्थित होते यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात अंबुले यांनी सांगितले कि जीवनात किती पैसे कमावले का किती शिक्षण घेतले याला महत्व नाही तर आपण आपल्या पाल्याना काय संस्कार व शिक्षण दिले याला महत्व आहे . तुमच्या काळात शिक्षण घेणे हे अडचणीचे होते परंतु तुम्ही तुमच्या पाल्याना उच्च शिक्षण दिले हे महत्वाचे असून यातील बरेच जण देशसेवा करून निवृत्त जीवन जगात आहे.

याचा अभिमान असल्याचे सांगत विशेष म्हणजे तब्बल तीस वर्षांनी हे विद्यार्थी एकत्र येतात हेच महत्वाचे आहे . यावेळी माजी प्राचार्य नंदकुमार कोल्हे,एम. बी. जासूद ,सुखदेव ढूस ,प्रा. सिंधू कोल्हे व प्रा. लता पोटे यांची मनोगते झाली तसेच विद्यार्थ्यांपैकी बाबाजी कावरे ,रुबिना राजे,उर्मिला शेंडगे व प्रशांत टेमकर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले . यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत सुनील ठुबे यांनी केले, सूत्रसंचालन पत्रकार उदय शेरकर यांनी केले तर आभार प्रशांत टेमक यांनी मानले.

# पारनेरमध्ये "जिजाऊंच्या लेकींचा' वैचारिक जागर"

## राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

स्वराज्याची जननी राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि भारतीय युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून पारनेर येथे सावित्री फातिमा सदभावना मंच आयोजित जिजाऊंच्या लेकींचा" वैचारिक जागर ,"हा परिसंवाद मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमातून जिजाऊंच्या संस्कारांचा आणि विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सोनिया औटी होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सावित्री फातिमा सद्भावना मंचचे कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद, ॲड. भारती तराळ, शिक्षिका शगुफा शेख, मीरा पुजारी, प्रा.तहेनीश शेख, राजेंद्र करंदीकर, शाहूराव औटी, संतोष खोडदे, कारभारी बाबर, संभाजी औटी,प्रकाश नांगरे, संदीप ठाणगे, गणेश भोसले, शैलेंद्र औटी, गौतम साळवे,भाऊसाहेब औटी, भिकाजी जगदाळे,पत्रकार विनोद गायकवाड, पत्रकार श्रीनिवास शिंदे,बाळासाहेब शेटे, सचिन पठारे,सलीम राजे, राजुभाई शेख, अविनाश देशमुख,रोशनी गायकवाड, आकांक्षा शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा.शाहूराव औटी यांनी जिजाऊंची वंदना सादर करून केली. मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष खोडदे यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी सावित्री फातिमा सदभावना मंचने संत महात्मे , थोर महापुरुष यांच्या समाजाप्रती असलेले मौलिक आदर्श विचार युवा पिढीला तसेच संत महात्म्यांनी केलेल्या समाज कार्याची ओळख व्हावी आणि त्या प्रमाणे योग्य दिशा मिळावी या वैचारिक सोहळ्या मागची भूमिका स्पष्ट केली.अध्यक्षीय भाषणात डॉ. सोनिया औटी यांनी राजमाता जिजाऊंच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, "जिजाऊंनी केवळ एका पुत्राला जन्म दिला नाही, तर एका महान विचाराला जन्म दिला. त्यांच्या संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य घडवू शकले. आजच्या काळातही महिलांनी जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे."डॉ. रफिक सय्यद यांनी आपल्या भाषणात खंत व्यक्त केली की, समाजातील काही अपप्रवृत्तीने महापुरुषांचा इतिहास चुकीच्या पद्धतीने मांडला आहे. त्यामुळे खरा इतिहास लोकांसमोर येणे महत्त्वाचे आहे तर ॲड. भारती तराळ आणि प्रा.तहेनीश शेख यांनीही आपल्या भाषणातून जिजाऊं , छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण विचार मांडले. जिजाऊंनी प्रतिकूल परिस्थितीत जो संयम आणि धाडस दाखवले, ते आजही प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

आकांक्षा शिंदे हिने जिजाऊ, शिवाजी महाराज यांच्या समवेत मुस्लिम मावळे यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली .इतर विद्यार्थिनींनी जिजाऊंच्या संस्कारांतून घडलेला शिवबा आणि आजच्या युगातील तरुणींची जबाबदारी यावर प्रभावी भाषणे केली. या चिमुकल्या रणरागिणींच्या वक्तृत्वाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले.या कार्यक्रमाला पारनेर परिसरातील नागरिक, महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक ऐक्याचे प्रतीक म्हणून सावित्री फातिमा सद्भावना मंचच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेला पुढाकार चर्चेचा विषय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अशोक शिंदे यांनी केले तर आभार भाऊसाहेब औटी यांनी मानले.

# विद्यार्थ्यांसाठी पुढील ५ दिवस राज्यातील शाळांना सुट्टी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थी आणि पालकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. राज्यातील शाळांना पुढचे ५ दिवस सुट्ट्या असणार आहेत. मकरसंक्रांत आणि महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, राज्य सरकारने याबाबत निर्णय घेतला आहे. याचसोबत मतदान केंद्र असलेल्या शाळा आणि कार्यालयांना सुट्टी दिली आहे. राज्यातील शाळांना उद्या म्हणजेच १४ जानेवारीपासून सुट्ट्या असणार आहे. शाळा आता थेट पुढच्या सोमवारी सुरु होणार आहे. १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांत आहे. यानंतर १५ आणि १६ जानेवारीला महापालिका निवडणुका आहेत. १५ जानेवारीला महापालिका निवडणुकीसाठी मतदान तर १६ जानेवारीला मतमोजणी आहे. यानिमित्त शाळांना सुट्ट्या असणार आहे. अनेक शाळांमध्ये मतदान केंद्र आहेत. त्यामुळे सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. १५ आणि १६ जानेवारीला महापालिका निवडणुका झाल्यानंतर शनिवारी अनेक शाळांना सुट्टी असते. यानंतर रविवारी शाळांना सार्वजनिक सुट्टी असणार आहे. त्यामुळे उद्यापासून शाळांना ५ दिवस सलग सुट्टी असणार आहे. अनेक सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांना निवडणुकीसाठी ड्युटी लागली आहे. त्यामुळे महापालिका भागातील अनेक शिक्षक इलेक्शन ड्युटीवर आहेत. त्यामुळे शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.मतदानासाठी ज्या शाळांच्या इमारती, कार्यालये, सभागृह, संस्थांमध्ये मतदान केंद्राची निर्मिती केली आहे.

# सिडको हडको परिसरात पोलीसांचे पथसंचलन

**नवीन नांदेड -: (समर्थ गांवकरी)**



नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने सिडको हडको परिसरातील मुख्य मार्गावर ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कायदा व सुव्यवस्थेचा दृष्टीकोनातून पोलीसांचे पथसंचलन करण्यात आले. मनपा निवडणूक दृष्टीने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि.12 जानेवारी रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार ग्रामीण उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी रममाता चौक ढवळे कॉर्नर ते सिडको परिसरातील मुख्य मार्गावर महाराणा प्रतापसिंह महाराज पुतळा मार्ग क्रांती चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा ते ज्ञानेश्वर नगर, डॉ.ढगे मार्ग या परिसरात पोलीस पथसंचलन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे,रेखा काळे, ऊपनिरीक्षक साळुंके,चव्हाण, केंद्रे ,यांच्या सह पोलीस अंमलदार, महिला पोलिस कर्मचारी,होमगार्ड यांच्या पथसंचलन मध्ये सहभाग होता. सायंकाळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या पिरबुहरान नगर येथील मुख्य मार्गावर पोलीस पथसंचलन करण्यात आले.

# पारनेरमध्ये जिजाऊंच्या लेकींचा वैचारिक जागर

## राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



स्वराज्याची जननी राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि भारतीय युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून पारनेर येथे सावित्री फातिमा सदभावना मंच आयोजित जिजाऊंच्या लेकींचा" वैचारिक जागर ,"हा परिसंवाद मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमातून जिजाऊंच्या संस्कारांचा आणि विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सोनिया औटी होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सावित्री फातिमा सद्भावना मंचचे कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद, ॲड. भारती तराळ, शिक्षिका शगुफा शेख, मीरा पुजारी, प्रा.तहेनीश शेख, राजेंद्र करंदीकर, शाहूराव औटी, संतोष खोडदे, कारभारी बाबर, संभाजी औटी,प्रकाश नांगरे, संदीप ठाणगे, गणेश भोसले, शैलेंद्र औटी, गौतम साळवे,भाऊसाहेब औटी, भिकाजी जगदाळे,पत्रकार विनोद गायकवाड, पत्रकार श्रीनिवास शिंदे,बाळासाहेब शेटे, सचिन पठारे,सलीम राजे, राजुभाई शेख, अविनाश देशमुख,रोशनी गायकवाड, आकांक्षा शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. शाहूराव औटी यांनी जिजाऊंची वंदना सादर करून केली. मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष खोडदे यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी सावित्री फातिमा सदभावना मंचने संत महात्मे , थोर महापुरुष यांच्या समाजाप्रती असलेले मौलिक आदर्श विचार युवा पिढीला तसेच संत महात्म्यांनी केलेल्या समाज कार्याची ओळख व्हावी आणि त्या प्रमाणे योग्य दिशा मिळावी या वैचारिक सोहळ्या मागची भूमिका स्पष्ट केली.अध्यक्षीय भाषणात डॉ. सोनिया औटी यांनी राजमाता जिजाऊंच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, "जिजाऊंनी केवळ एका पुत्राला जन्म दिला नाही, तर एका महान विचाराला जन्म दिला. त्यांच्या संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य घडवू शकले. आजच्या काळातही महिलांनी जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे."डॉ. रफिक सय्यद यांनी आपल्या भाषणात खंत व्यक्त केली की, समाजातील काही अपप्रवृत्तीने महापुरुषांचा इतिहास चुकीच्या पद्धतीने मांडला आहे. त्यामुळे खरा इतिहास लोकांसमोर येणे महत्त्वाचे आहे तर ॲड. भारती तराळ आणि प्रा.तहेनीश शेख यांनीही आपल्या भाषणातून जिजाऊं , छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण विचार मांडले. जिजाऊंनी प्रतिकूल परिस्थितीत जो संयम आणि धाडस दाखवले, ते आजही प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थिनींनी मांडलेले वैचारिक विचार. रोशनी गायकवाड, आकांक्षा शिंदे, अपूर्वा गाडेकर, श्रावणी पोटे आणि कल्याणी आढाव या जिजाऊंच्या लेकींनी अत्यंत अभ्यासपूर्ण शैलीत आपली मनोगते व्यक्त केली. रोशनी गायकवाड हिने जिजाऊंच्या युद्ध कौशल्यबद्दल आणि महापुरुषांबदल माहिती दिली.आकांक्षा शिंदे हिने जिजाऊ, शिवाजी महाराज यांच्या समवेत मुस्लिम मावळे यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली .इतर विद्यार्थिनींनी जिजाऊंच्या संस्कारांतून घडलेला शिवबा आणि आजच्या युगातील तरुणींची जबाबदारी यावर प्रभावी

# अहिल्यानगर शहराची हवा ही युतीच्या बाजूने

## द ग्रेट खली : एन्ट्रीने भाजपा राष्ट्रवादीच्या प्रचारात रंगत !

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर शहरातील महापालिका निवडणुकीच्या प्रचारात आज एक वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. जागतिक कीर्तीचे कुस्तीपटू द ग्रेट खली यांच्या आगमनामुळे प्रचाराला मोठे बळ मिळाले. सकाळी ११ वाजता नगरमध्ये दाखल झाल्यानंतर खली यांनी सर्वप्रथम विशाल गणपतीचे दर्शन घेतले.

गणपती दर्शनानंतर गणपती मंदिर ते दिल्ली गेट या मार्गावर भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान द ग्रेट खली यांनी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या साध्या आणि प्रेरणादायी शब्दांना नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. रॅलीमुळे



संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना द ग्रेट खली यांनी स्पष्ट भूमिका मांडली. सध्या अहिल्यानगर शहराची हवा ही भाजप–राष्ट्रवादी युतीच्या बाजूने एकतर्फी दिसून येत आहे, असे मत व्यक्त करत त्यांनी नगरच्या पाणी, रस्ते, रोजगार व विकासाशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी भाजप– राष्ट्रवादी युतीला मतदान करण्याचे थेट आवाहन खली यांनी केले. सक्षम नेतृत्व आणि विकासाभिमुख विचारांच्या जोरावर शहराचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी द ग्रेट खली यांनी युवकांना उद्देशून नियमित व्यायामाचे महत्त्व अधोरेखित केले. युवक शारीरिकदृष्ट्या सक्षम राहिले तर देशही सक्षम होईल. भारताला विश्वगुरू बनवायचे असेल तर आरोग्य आणि शिस्त या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत," असे त्यांनी सांगितले. तसेच नगर शहराच्या समस्या सोडविण्यासाठी भाजप–राष्ट्रवादी युतीला मतदान करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

खली यांनी डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या कार्यशैलीचे खुलेपणाने कौतुक केले. "शहराच्या प्रश्नांवर त्यांची ठाम भूमिका असून विकासासाठी ते सातत्याने मेहनत घेत आहेत. त्यांच्या कामातून सकारात्मक बदल दिसून येतो, म्हणूनच आज या रॅलीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला," असे मत त्यांनी व्यक्त केले.

### 'नगरमधील प्रचाराला नवी दिशा'

द ग्रेट खली यांच्या उपस्थितीमुळे नगरमधील प्रचाराला नवी दिशा मिळाली असून, आगामी निवडणुकीत भाजप राष्ट्रवादी युतीला याचा निश्चितच लाभ होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.या रॅलीत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्यासह भाजप–राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे उमेदवार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# महिला व्यावसायिक कार्यशाळा संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

चाईल्डफंड इंडिया आणि स्किल इंडिया हब यांच्या संयुक्त विद्यमाने, रॅम्प योजनेअंतर्गत गौरी शंकर सामाजिक प्रतिष्ठान, जुन्नर माध्यमातून महिला बचत गटांसाठी एकदिवसीय मोफत व्यावसायिक कार्यशाळे चे आयोजन सांगनोरे येथे करण्यात आले. कोल्हेवाडी, वाघेचीवाडी, इरनकवाडी, लोहोकरवाडी व गवारवाडी या गावांमधील महिलांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.एकूण १०५ महिला तसेच १५ महिला बचत गटांच्या अध्यक्षा, सचिव व सदस्यांनी उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.

कार्यशाळेचे प्रशिक्षण मिनाथ जाधव यांनी प्रभावी रीत्या घेतले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन मंगेश आतकर आणि विश्वास गालफाडे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमासाठी अजित सौर सर



(फील्ड कोऑर्डिनेटर) आणि अभिजीत मदने (प्रकल्प अधिकारी) यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. सर्वांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद उमेद पंचायत समिती, जुन्नर येथील श्रीमती उषा अभंग यांनी भूषवले.तसेच उमेद पंचायत समितीचे सागर टिकेकर, सांगनोरे ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश मराडे, ग्रामसेवक चिंतामण केंगळे, कर्मचारी विलास नायकोडी, लक्ष्मण गवारी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष भर पडली.

तसेच स्किल इंडिया हबचे अक्षय कुटे व मयूर मेहेर, तसेच मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रमुख संतोष सावंत यांचीही उपस्थिती लाभली. याशिवाय आशा मराडे, रोहिणी वायळ, रविना मोरे (C.R.P), प्रियांका मोरे, उर्मिला मोरे, सुजाता मोरे, मोनिका नायकोडी तसेच इतर महिला कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाला उत्साहपूर्ण साथ दिली. कार्यशाळेदरम्यान महिलांना कौशल्य विकास, स्वयंरोजगाराच्या संधी, आर्थिक सक्षमीकरण, तसेच उद्यमशीलता विकास या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले.

# शिर्डीत 'विश्व श्री साई स्पंदन' सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी आणि ग्रीन अँड क्लीन शिर्डी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऐतिहासिक 'विश्व श्री साई स्पंदन' (Vishwa Shree Sai Spandan) सोहळा, शनिवारी (दि. १०) सायंकाळी अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'डिजिटल साई दरबार' (Digital Sai Darbar). तंत्रज्ञानाच्या या अनोख्या उपक्रमाद्वारे देश-विदेशातील १,००० हून अधिक श्री साई मंदिरे आणि लाखो साईभक्त शिर्डीच्या पवित्र भूमीशी थेट जोडले गेले होते.

भव्य डिजिटल साई दरबार: श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा सांस्कृतिक भवनात




४०x२० फुटांची भव्य एलईडी स्क्रीन (LED Wall) उभारण्यात आली होती. या स्क्रीनवर झूम (Zoom) द्वारे जोडलेली जगभरातील विविध मंदिरे आणि तेथील भाविक एकाच वेळी दिसत होते. यामुळे "भाविकांनी शिर्डीत बाबांचे दर्शन घेतले आणि शिर्डीने भाविकांच्या भक्तीचे दर्शन घेतले," असा एक अभूतपूर्व 'दुहेरी संवाद' (2-Way Divine Connection) साधला गेला.

सामूहिक स्तवनमंजिरी पठन: "एकाच वेळी, एकाच स्वरात, संपूर्ण विश्व" (One Time, One Chant, One World) या संकल्पनेनुसार, सायंकाळी ६:२० वाजता शिर्डीसह जगभरातील सर्व जोडलेल्या मंदिरांमध्ये एकाच वेळी 'श्री साईनाथ स्तवनमंजिरी' चे सामूहिक पठन करण्यात आले. यामुळे संपूर्ण वातावरण साईमय झाले होते.

# पतंग ऐवजी उडवले ड्रोन

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

डिंभे ता.आंबेगाव येथील शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बुधवार दि.१४ रोजी होणाऱ्या मकरसंक्रातीच्या निमित्ताने पतंग उडवणे ऐवजी ड्रोन फ्लाईंग चे प्रात्यक्षिक केले.ड्रोन उडवल्यानंतरचा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता. विज्ञान पाबळ आश्रम आणि स्टार फोरम यांच्या अंतर्गत राबविण्यात आलेला आयबीटी कार्यक्रमाअंतर्गतड्रोन फ्लाईंग उपक्रम राबविण्यात आला. असे सांगून मुख्याध्यापक सुनील वळसे पाटील म्हणाले आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी या ड्रोन फ्लाईंग प्रात्यक्षिकाचा उपयोग नवीन नवनवीन क्षेत्रात करतील. आणि यांचे मार्गदर्शन आयबीटी संस्था स्टार फोरम आणि विद्यालयातील शिक्षक नक्कीच विद्यार्थ्यांना करतील.

# जिजाऊंच्या संस्कारातून जगाला हेवा वाटणारे स्वराज्य निर्माण झाले

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

राजमाता जिजाऊंच्या जीवनातील स्वाभिमानी बाणा, त्याग आणि समर्पणाची वृत्ती स्वराज्याची मूहर्तमेढ रोवणारी ठरली. तेच संस्कार बाल शिवबावर पडले. जिजाऊंच्या संस्कारामधून जगाला हेवा वाटावा असे रयतेचे स्वराज्य उभे झाले.असे मत शिवव्याख्याते अँड सतीशचंद्र रोठे पाटील यांनी व्यक्त केले.

एमपीएससीचे विद्यार्थ्यांचे दालन न्यू दीपस्तंभ कॅरीर अकॅडमी बुलढाणा यांच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या 428 व्या जयंतीनिमित्ताने राष्ट्रमाता जिजाऊ आणि मातृतीर्थ बुलढाणा जिल्हा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवव्याख्याते म्हणून उपरोक्त मत अँड रोठेंनी व्यक्त केले. सर्वप्रथम राष्ट्रमाता जिजाऊ, युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे



शिवव्याख्याते रोठेपाटील

सामूहिक पूजन दीप प्रज्वलन करून व्याख्यानाला सुरुवात करण्यात आली. यावेळी न्यू दीपस्तंभ अकॅडमीचे डॉ. नितीन जाधव सर, प्रा.नीलेश शिंदे सर, प्रा. टेकाळे. राष्ट्रमाता जिजाऊ फाउंडेशनचे संस्थापक राजेश हेलगे, रमाई ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सुरेखाताई निकाळजे, ग्राम स्वराज्य समितीचे कमलाकर व्यवहारे,प्रा.भाग्यश्री तायडे,प्रा.रवींद्र बुंदे, प्रा.शेळके आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविक अकॅडमीचे संस्थापक नितीन जाधव यांनी आभार प्रदर्शन संदीप शिंदे यांनी केले. तर उत्कृष्ट संचालन अजय जाधव यांनी केले. तर उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रमाता जिजाऊ जयंती अनुषंगाने समयोचित मनोगत व्यक्त केले.

अॅड.रोठेंनी राष्ट्रमाता जिजाऊंचा जीवन संघर्ष आणि यशस्वीतेची त्रीसूत्री यावर विविध उदाहरणे देत आपल्या खास शैलीत विद्यार्थ्यांसमोर 428 वर्षांपूर्वीचा इतिहास आणि वर्तमान परिस्थिती यावर उद्बोधन केले. यावेळी न्यू दीपस्तंभ करिअर अकॅडमीचे सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी तथा एमपीएससी यूपीएससी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षणार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# महिला व विद्यार्थ्यांनिंच्या आरोग्य रक्षणासाठी नरेश राऊत फौंडेशनचा पुढाकार

## २२ शाळांना व्हेंडिंग व डिस्पोजल मशीनचे वितरण

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

श्री नरेश राऊत फाउंडेशन व आय डी बी आय ट्रस्टीशिप सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमातून महिला व विद्यार्थ्यांनिच्या आरोग्य रक्षणासाठी 22 शाळांमध्ये सॅनिटरी पॅड, व्हेंडिंग व डिस्पोजल मशीनचे वाटप करण्यात आले.

नुकताच 10 जानेवारी रोजी श्री नरेश राऊत फाउंडेशन व आय डी बी आय ट्रस्टीशिप सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या सीएसआर भागीदारीतून अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता, राहुरी, अकोले, श्रीरामपूर व कोपरगाव तालुक्यातील एकूण २२ शाळांमध्ये सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन व डिस्पोजल मशीनचे वितरण करण्यात आले.

हा कार्यक्रम अगस्ती आर्ट्स, कॉमर्स अँड दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी अ. ता. एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर होते.यावेळी आयडीबीआय ट्रस्टीशिप सर्व्हिसेस लिमिटेड चे उपाध्यक्ष सनी निल्हानी,सेक्रेटरी इंद्रनील मैत्रा यांच्या हस्ते मशीन चे वितरण करण्यात आले.यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा सौ.मीना राऊत,संचालिका सौ.मौसमी राऊत, सौ.पल्लवी राऊत,विलास महाले,प्राचार्य शरद गमे,सर्व विद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग उपस्थित होता.

या उपक्रमाचा ५५५० पेक्षा अधिक शाळकरी मुलींना थेट लाभ झाला असून, ग्रामीण व आदिवासी भागातील मुलींना मासिक पाळीच्या काळात स्वच्छता, सुरक्षितता, सन्मान व आरोग्याच्या




सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. शाळांमध्ये सहजपणे सॅनिटरी पॅड उपलब्ध झाल्यामुळे मुलींची शाळेतील उपस्थिती वाढण्यास तसेच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होत आहे.

या उपक्रमाद्वारे मासिक पाळीविषयी असलेली संकोचाची भावना दूर करून जनजागृती, योग्य स्वच्छतेचे महत्त्व आणि सुरक्षित डिस्पोजल पद्धतीबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले.

या सामाजिक उपक्रमासाठी आय डी बी आय ट्रस्टीशिप सर्व्हिसेस लिमिटेड यांनी सी एस आर अंतर्गत दिलेल्या सहकार्याबद्दल श्री नरेश राऊत फाउंडेशनने कृतज्ञता व्यक्त केली. भविष्यातही अशाच प्रकारच्या उपक्रमांद्वारे अधिकाधिक शाळा व विद्यार्थिनींपर्यंत पोहोचण्याचा फाउंडेशनचा मानस असल्याचे मत सचिव लक्ष्मण गोर्डे यांनी व्यक्त केला. अध्यक्ष सुनील दातीर यांनी हा उपक्रम स्तुत्य असल्याचे सांगून फाऊंडेशन च्या कार्याचे कौतुक केले.

# सेलिब्रेटींच्या गाव भेटी

**जिल्हा परिषद, ठाणे: (समर्थ गांवकरी)**

राज्यात दि. १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी व व्यापक प्रचार-प्रसिद्धीसाठी शासन स्तरावर विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अभियानांतर्गत ग्रामीण भागात लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने सेलिब्रेटींच्या गाव भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून, त्यासंदर्भात प्राप्त वेळापत्रकानुसार दि. १७ जानेवारी, २०२६ रोजी ठाणे जिल्ह्यात मान्यवर सेलिब्रेटींच्या भेटी निश्चित करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत या अभियानाच्या प्रचार व जनजागृतीसाठी शिवाली परब आणि पृथ्वीक प्रताप हे मान्यवर सेलिब्रेटी ठाणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील गावांना भेट देणार आहेत.

# भविष्यात म्हसा यात्रा बंद होण्याच्या मार्गावर

**मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यात सुप्रसिद्ध असलेल्या म्हसा यात्रेत लाखोंच्या संख्येने भाविक येत असल्याने त्यांचे मनोरंजन करण्यासाठी महाराष्ट्रातील तमाशा कलावंत येत असताना जागा मालक आणि प्रशासनाकडून होणारी लुटमार टाळण्यासाठी त्यांनी या यात्रेकडे पाठ फिरवली. आणि त्याच भाविकांची पाकिटमारा कडुन मोठ्या प्रमाणात लुटमार झाल्याच्या शेकडो घटना घडल्या तर या यात्रेत हजारोंच्या संख्येने विविध व्यवसाय करण्यासाठी येणाऱ्या व्यापाऱ्यांची जागेचे भाडे.अकृषीक कर ,व यात्रा कर अशा प्रकारे सक्तीने वसुली होत असल्याने पाकिटमार आणि प्रशासन यांचेकडून होणाऱ्या लुटमारीमुळे भविष्यात म्हसा यात्रा बंद होण्याच्या मार्गावर असल्याने भावीकामध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

> ■ म्हसा यात्रेत भावीकांची पाकिटमारा कडुन तर व्यापाऱ्यांची प्रशासनाकडून लुट

ठाणे जिल्ह्यातील म्हसा यात्रा ही गुरांचे बाजारासाठी,शेतीचे औजारासाठी तसेच घोंगडी,ब्लाकेंट व इतर संसारोपयोगी वस्तू प्रसिद्ध असल्याने या पंधरा दिवस चालणाऱ्या या यात्रेत लाखो भाविक व हजारो व्यवसाईक येत असल्याने या यात्रेकरूंचे मनोरंजनासाठी महाराष्ट्रातील तमाशाचे फड सालाबादप्रमाणे आपली हजेरी लावतात.परंतु त्यांचे कनातीसाठी लागणारी जागा तिचे न परवडणारे भाडे. तसेच प्रशासनाकडून फुकट्या प्रेक्षकाकडुन होणारी लुटमार याचा विचार करता ते परवडत नसल्याने या तमाशा कलावंतांनी म्हसा यात्रेकडे पाठ फिरवली आहे.तर हजारो व्यवसाईक हे विविध प्रकारचे व्यवसाय करत असुन त्यांची देखील जागा मालक ,महावितरण,व प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात लुटमार होत आहे.या यात्रेचा आंनद घेण्यासाठी येणारे भाविक हे कुटुंब कबिल्यासह येत असुन त्यांची देखील पाकिटमारा कडुन अनेक महिलांचे दागिने, मोबाईल.रोख रक्कम व इतर किमंती वस्तूंची लुटमार केली जात असल्याने या भाविकांना घरी परतत असताना दुसऱ्याकडे हात पसरावे लागतात.

या प्रकारामुळे म्हसा यात्रेचे पावित्र नष्ट पावत असल्याने भविष्यात भाविक यात्रेकडे पाठ फिरवणार असल्याने शेकडो वर्षाची परंपरा असलेली म्हसा यात्रा बंद पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# विद्यार्थ्यांच्या दुचाकीला दूध टँकरची धडक

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मंचर ता.आंबेगाव येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयामध्ये इयत्ता ११ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या दुचाकीला दूध टँकरने धडक दिल्यामुळे दोघे विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना पुणे-नाशिक रस्त्यावरील मंचर जवळील एकलहरे गावाजवळ मंगळवार दि.१३ रोजी सकाळी ११ वाजता घडली आहे.

पुणे-नाशिक बायपास सर्विस रोड एकलहरे-कळंब कडे येतो. त्या बाजूने येणारा टँकरने महामार्ग कडे वळण्यासाठी उजव्या बाजूने जागेवर टर्न मारला असता कळंब कडून मंचरच्या दिशेने येत असलेल्या दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दुचाकीला टँकरने जोरदार धडक दिल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. त्यामध्ये दोघे विद्यार्थी गंभीर जखमी झाले.जखमी विद्यार्थ्यामध्ये रोहित चिमटे वय १७ राहणार कुकडेश्वर ता.जुन्नर तर कार्तिक दिवटे वय १७ राहणार आंबेहातवीज ता.जुन्नर असे आहेत.ते शिक्षणासाठी मंचर येथील आदिवासी वसतीग्रहात राहून मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात इयत्ता ११ वी मध्ये शिक्षण घेत आहे. दोन्हीही विद्यार्थ्यांना मंचर येथील खाजगी दवाखान्यात नेले असून त्यांच्या वर वैद्यकीय उपचार सुरु असल्याचे सांगण्यात आले.मंचर पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली.अपघातस्थळावर नांदूर येथील एका युवकाचा मृत्यू पाच महिन्यापूर्वी झाला होता.अपघातस्थळावर उपरस्ता व महामार्ग या दोन्हींच्या मध्ये डिव्हायडर टाकण्यात यावे किंवा रेलिंग बसवण्यात यावी.

# भाविकांची पिळवणूक करणाऱ्या एजंटांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शनिशिंगणापूर (ता. नेवासा) येथे देशभरातून येणाऱ्या भाविकांची एजंटांकडून (लटकू) होणारी आर्थिक पिळवणूक, फसवणूक व असुविधा रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरचे उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १५२ (१) (a) अन्वये शिंगणापूर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

शनिशिंगणापूर हे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, शनिशिंगणापूर पोलीस ठाणे आणि नेवासा तहसीलदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मंदिर परिसर तसेच गावाच्या बाहेरील




रस्त्यांवर काही खासगी व्यक्ती (एजंट/लटकू) भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानांतूनच चढ्या दराने पूजा साहित्य खरेदी करण्यास भाग पाडतात. भाविकांनी यास विरोध केल्यास त्यांना दमदाटी व शिवीगाळ केली जाते. सन २०२५ मध्ये अशा प्रकारच्या ५३ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या प्रकारांमुळे भाविकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

जारी करण्यात आलेले प्रमुख आदेश-

१. वाहने अडविण्यास मनाई: शिंगणापूर गावाच्या बाहेरील किंवा गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे, प्रवेश मार्ग किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अथवा त्यांच्या वाहनांना थांबविणे, अडविणे किंवा त्यांना विशिष्ट ठिकाणी जाण्यासाठी सक्ती करणे, यास तात्काळ प्रतिबंध करण्यात आला आहे.
२. खरेदीची सक्ती नको: भाविकांना कोणत्याही विशिष्ट दुकानातून किंवा आस्थापनेतूनच खरेदी करणे, निवास करणे किंवा कोणताही व्यवहार करण्याचे सुचवू नये. याबाबत भाविकांना निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य राहील.
३. तोतयागिरीस प्रतिबंध : कोणत्याही खासगी व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये.
४. मध्यस्थीस मनाई : भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीने मध्यस्थीचे व्यवहार करू नयेत.

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला दिनांक २८/०१/२०२६ पर्यंत उपविभागीय दंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात उपस्थित राहून आपली बाजू किंवा हरकत नोंदवता येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# हिंदुत्व आणि समाजासाठी रक्तदान करणे कर्तव्य

- ह.भ.प. कैलास महाराज भोरे
- जिजाऊ जयंतीच्या निमित्त रक्तदान शिबीरात 120 रक्तदात्यांनी केले रक्तदान



**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

ह.भ.प. कैलास महाराज भोरे म्हणाले, "हिंदुत्व आणि समाजासाठी रक्तदान करणे हे आपले कर्तव्य आहे. जिजाऊंच्या जयंतीनिमित्त प्रत्येकाने रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे." असे मत ह.भ.प. कैलास महाराज भोरे यांनी रक्तदान शिबीरा दरम्यान व्यक्त केले. यावेळी या रक्तदान शिबिरात 120 जणांनी रक्तदान केले. राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मंगेश दादा आजबे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित अकराव्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी मंगेश आजबे यांनी बोलताना सांगितले की या रक्तदान शिबिरामुळे आतापर्यंत तब्बल ५१७ रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन रक्ताची मदत मिळाली आहे. काही रुग्णांना मोफत तर काहींना अल्प दरात रक्त देऊन खऱ्या अर्थाने मानवतेची सेवा करण्यात आली आहे. सर्वात श्रेष्ठ कार्य रक्तदान आहे. यामुळे रक्तदान शिबिरामुळे अनेक गोरगरीबांना देखील मदत होते त्यामुळे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येथे. या रक्तदान शिबीरास कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांच्या मातोश्री सुनंदाताई पवार यांनी भेट दिली. व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मंगेश आजबे यांनी गेली आकरा वर्षापासून जे रक्तदान शिबीर घेतात त्यास शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या या कार्याचे कौतुक केले. मंगेश (दादा) आजबे यांनी आपल्या मनोगतात जिजाऊंच्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "जिजाऊंच्या संस्कारातूनच शिवराय घडले. आज तोच खरा वारसा शेतकरी जपत आहे. कष्ट, संयम आणि संकटाशी झुंज देण्याची ताकद शेतकऱ्याच्या रक्तात आहे. शेतकरी अडचणीत असला तरी हार न मानता अन्यायाविरुद्ध उभा राहिला पाहिजे.

जिजाऊ जयंतीनिमित्त सर्व शेतकरी बांधवांना समृद्ध शेती व सुखी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या " सुधीर राळेभात यांनी मंगेश दादा यांच्या समाजकार्याची प्रशंसा करत सांगितले की, "रक्तदान हे सर्व श्रेष्ठ दान आहे विविध उपक्रमांतून ते सातत्याने समाजसेवा करत आहेत. जिजाऊ जयंतीनिमित्त सर्व उपस्थितांचे आभार व शुभेच्छा देण्यात आले. डॉ. हजारे यांनीही माहिती देताना सांगितले की, "हे शिबिर जिजाऊ उत्सवाच्या निमित्ताने सलग अकरावे वर्ष आहे. या काळात ५१७ रुग्णांना रक्तपुरवठा करून त्यांचे प्राण वाचवले गेले, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. जिजाऊंचे कार्य केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण देश व जगासाठी प्रेरणादायी आहे."जिजाऊ जयंतीनिमित्त रक्तदानाच्या माध्यमातून समाजसेवेचा हा आदर्श उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.




# रविंद्रनाथ टागोर शाळेत मा जिजाऊ जयंती साजरी

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

रविंद्रनाथ टागोर प्राथमिक शाळा कंधार येथे ता १२ जानेवारी रोजी स्वराज्य जननी माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित मनोगत व्यक्त केली, माहीन शेख, योगेश्वरी टेंभुर्णेवार, पुणम कल्याणकर, शितल कल्याणकर, रुपाली डुबुकवाड या विद्यार्थिनींनी माँ जिजाऊ यांचा पाळणा व गीत सादर केले तर गणेश कल्याणकर, नारायण कल्याणकर, लखन वाघमारे या विद्यार्थ्यांनी जिजाऊ वंदना सादर केली. कार्यक्रमाचा शेवट "आम्ही शिवकन्या" या गीतावर नृत्य सादर करुन करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सचिव जी जी यन्नावार, मुख्याध्यापक एस जी मुंडे, सहशिक्षक श्रीमती शेख, श्रीमती यन्नावार एम जी, श्रीमती परोडवाड, सुर्यवंशी, तिडके, होंडाळे, तपासे, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन पुनम कल्याणकर यांनी केले.

# चंद्रकांत कदम यांना 'इलाही जमादार गझलरत्न' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

नांदेडसह महाराष्ट्रातील साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक चळवळीत अग्रेसर असणाऱ्या अक्षरोदय साहित्य मंडळ, महाराष्ट्र राज्य आणि मातोश्री भागाबाई विठ्ठलराव डोंगरे प्रतिष्ठान, उमरी (ता. उमरी, जि. नांदेड) यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा राज्यस्तरीय 'इलाही जमादार गझलरत्न पुरस्कार – २०२६' यंदा नांदेड येथील प्रसिद्ध गझलकार चंद्रकांत देवराव कदम (सन्मित्र) यांना जाहीर करण्यात आला आहे.



नुकत्याच पार पडलेल्या दोन्ही संस्थांच्या संयुक्त बैठकीत पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. या बैठकीस अक्षरोदय साहित्य मंडळाच्या राज्याध्यक्षा सिंधुताई दहिफळे, मातोश्री भागाबाई विठ्ठलराव डोंगरे प्रतिष्ठानचे सचिव नागोराव डोंगरे, अक्षरोदय साहित्य मंडळाचे राज्य उपाध्यक्ष मा. चंद्रकांत चव्हाण, राज्य कार्याध्यक्ष सदानंद सपकाळे, नांदेड जिल्हाध्यक्ष सुनंदा भगत, मनिषा सपकाळे, निवड समितीचे अध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांच्यासह दोन्ही संस्थांचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चंद्रकांत कदम हे उच्च विद्याविभूषित, उपक्रमशील शिक्षक असून सध्या जिल्हा परिषद हायस्कूल, जवळगाव (ता. हिमायतनगर) येथे कार्यरत आहेत. संवेदनशील गझलकार व प्रभावी निवेदक म्हणून त्यांचा राज्यभर लौकिक आहे. त्यांचा 'समतेच्या डोहाकाठी' हा गझलसंग्रह प्रसिद्ध गझलनवाज भीमरावजी पांचाळे यांच्या हस्ते प्रकाशित झाला असून तो अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित आहे. साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दलही त्यांना विविध मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.

या पुरस्काराच्या घोषणेनंतर साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रातून चंद्रकांत कदम यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नांदेडमधील परिवर्तन करण्यासाठी सज्ज


**नवीन नांदेड: (समर्थ गांवकरी)**

नांदेड मधील परिवर्तन करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी व काँग्रेस पक्ष एकत्र निवडणूक रिंगणात उतरले असून बेरोजगारी मोठ्या प्रमाणात या परिसरात वाढली असून सिडको लगत असलेली औद्योगिक वसाहतीतील बंद असलेले कारखाने त्वरित चालू करून रोजगार उपलब्ध करून द्यावा असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचा अंजलीताई आंबेडकर यांनी हडको येथे आयोजित उमेदवारांचा प्रचारार्थ जाहीर सभे प्रसंगी केले. प्रभाग क्रमांक 20 मधील वंचित बहुजन आघाडी व काँग्रेस पक्षाचे उमेदवार अ, दिपमाला विठ्ठल गायकवाड,ब गटातील सिमरनकौर गोपाल सिंघ टाक ,क मधुन महेश नारायण निळंकठवार,ड मधुन ज्योती संदीप कदम या उमेदवाराचा प्रचारार्थ हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

# पत्रकारांचा सन्मान होणे आवश्यक आहे - इंजि. विश्वंभर पवार

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

समाजातील घडामोडी जनतेपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचविण्याचे कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन इंजिनिअर विश्वंभर पवार यांनी केले. दर्पण दिनानिमित्त भोकर येथे दि. ८ जानेवारी रोजी आयोजित पत्रकारांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार एल ए हिरे, बी आर पांचाळ, संपादक उत्तम बाबळे, राजेश वाघमारे आदींसह पत्रकार बांधव तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, सत्य, पारदर्शकता आणि सामाजिक भान जपत पत्रकार समाजाला दिशा देण्याचे काम करतात. कोणताही राजकीय सामाजिक कार्यकर्ता पत्रकारांच्या लेखणीमुळेच मोठा होत असतो याची आपणास जाणीव असल्याचे सांगून पत्रकार बांधवांच्या महत्वपूर्ण कार्याची दखल घेऊनच हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भोकर तालुक्यातील विविध माध्यमांतील पत्रकारांचा शाल पुष्पगुच्छ, पेन आणि डायरी देऊन सन्मान करण्यात आला. सन्मानित पत्रकारांच्या वतीने संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बाबळे यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर आधुनिक काळातील बदलत्या पत्रकारितेची गुणवैशिष्ट्य याबाबत आपल्या भावना व्यक्त करत जबाबदारी पूर्ण सामाजिक विकासासाठी सकारात्मक पत्रकारितेचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार एल ए हिरे,बी आर पांचाळ, गणपतराव मुसळे, राजेश वाघमारे,शंकर कदम,रमेश गंगासागरे, जयभीम पाटील, गंगाधर पडवळे, आर के कदम,साईनाथ बंडोड, अनिल डोईफोडे, शिवाजी गायकवाड, संभाजी कदम, विनय दुर्केवार, पवार यांच्यावतीने उपस्थितांसाठी सुरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी आनंद पाटील ढवळे,शंकर पाटील बोरगावकर, रवी गेंटेवाड, इब्राहिम शेख, आनंद पाटील सिंधीकर, कृष्णा ठाकूर,दीपक सोरटे आदी सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

# बारड येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड तालुका मुदखेड जिल्हा नांदेड संचलित स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू माध्यमिक विद्यालय श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय तसेच श्री शितलादेवी सेवाभावी प्रतिष्ठान संचलित शंकरराव देशमुख इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आज बारड येथे शाळा व कॉलेजच्या प्रांगणात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात संपन्न झाले

दिनांक १२ जानेवारी रोजी सकाळी ठीक १० वाजता स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजय देशमुख बारडकर श्री शितलादेवी सेवाभावी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ छायाबाई संजय देशमुख व सर्व कार्यकारी मंडळ यांच्या हस्ते वार्षिक स्नेहसंमेलनाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन झाले. उद्घाटन प्रसंगी आदरणीय संजय देशमुख यांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना पालकांचे कर्तव्, विद्यार्थ्यांची शैक्षणिक भूमिका यावर आपला विचार मांडला व येणाऱ्या परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतानाच राष्ट्रीय कर्तव्यचा विसर होऊ नये असा संदेश दिला याप्रसंगी रमेशचंद्र महाजन, रामेश्वर कोरबनवाड,अशोक गव्हाणे, एन डी देशमुख, गौतम आठवले, आदी मान्यवर उपस्थित होते

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध कलागुणांचा मुक्त आविष्कार व्यासपीठाच्या माध्यमातून मिळाला याप्रसंगी लोकगीत, लोकनृत्य, लावणी,भारुड, शाहिरी पोवाडा गोंधळ यातून विद्यार्थ्यांनी परंपरेचे दर्शन घडवले तर छावा चित्रपटातील छत्रपती संभाजी राजे यांच्या बलिदानाच्या प्रसंगाने सर्वांच्या समोर क्रूर औरंगजेब व धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांचे मूर्तिमंत चित्रण उभे केले,

या कार्यक्रमासाठी परिसरातून मोठ्याप्रमाणात पालक महिला पुरुष व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य हेमंत इंगळे प्राचार्य सचिन गव्हाणे पाटील, मुख्याध्याप रामकिशन चूब्बेवार व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजनंदनी व्यवहारे,वेदिका पवार,अनुष्का मुसळे या विद्यार्थिनींनी केले तर आभार प्रा. डॉ. पंजाब शिंदे यांनी केले, सर्व उपस्थितांच्या भोजन व्यवस्थेने कार्यक्रमांची सांगता झाली.

# रूपाली परदेशी निवडणूक प्रक्रियेतील प्रोसिडिंग प्रत, सीसीटीव्ही कॅमेरे फुटेज व इतर वृत्तांतची मागणी

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगरपरिषद उपनगराध्यक्ष पदाचे उमेदवार

जुन्नर नगरपरिषद शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपनगराध्यक्ष पदाचे उमेदवार रूपाली आकाश परदेशी यांनी मंगळवार दिनांक १३ रोजी झालेल्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीची प्रोसिडिंग प्रत , सीसीटीव्ही कॅमेरे फुटेज व इतर वृत्तांत मिळण्याची मागणी सायंकाळी ७ :३० वा. मुख्याधिकारी चरण कोल्हे यांच्याकडे केली आहे .

# तामसा येथे शादीखाणाच्या ग्रहण कधी सुटणार

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगांव तालुक्यातील तामसा येथे अल्पसंख्यांक समाज साठी शादीखाणा उभारण्यांच ग्रहण कधी सुटणार बंद पडलेल्या बांधकाम सुरु करण्यात यावं असं निवेदन दिलं..



अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सहायता उपलब्ध योजना अंतर्गत इ. स. २०२४-२५ या कार्यकाळात माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी दिनांक १३/१०/२४ रोजी या शादीखाना बांधकामाचे भूमिपूजन करून अल्पसंख्यांक समाज च्या मागणी ला न्याय मिळाला परंतु संबंधित सत्य साई कन्ट्रक्शन कंपनीने सुरुवातीला शादीखाना च्या बांधकाम पायाभरणी करून अर्धवट सोडून दिलं सदर बांधकाम मागील ४ महिन्यापासून बंद असून. कंत्राटदाराला भ्रमणध्वनी वर सपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद मिळाला नाही म्हणून तामसा येथील अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक कार्यकर्ते जिया बागवान, फिरोज पाशा, सय्यद निसार, निशाद खान पठाण,अ. आरेफ, मुस्ताक खान यांनी मुख्य अभियंता बांधकाम भोकर यांना निवेदन देऊन बांधकाम पूर्ववत सुरु करावे अशा प्रकारे निवेदनात नमूद केले आहे.. शादीखाण्याच्या मागणी साठी मागील दहा वर्षांपासून लोकप्रतिनिधी सी निवेदन देऊन तत्कालीन आमदार यांनी २०२४-२५ च्या अल्पसंख्याक ग्रामीण बहुल क्षेत्रात मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करून योजना अंतर्गत १कोटी २५लाख रुपये निधी उपलब्ध करून दिली मोठ्या गाजावाजात भूमिपूजन करण्यात आलं पण कालांतराने हा बांधकाम संथगतीने सुरुवात होऊन मागील ४ महिन्यापासून ब्रेक झाल्याने संबंधित कंत्राटदारांचा भ्रमणध्वनी नॉट रिचेबल दाखवत आहे सदर शादीखाना च्या बांधकामाचे कार्यालीन अडचण काहीच नसल्याचे समजते अंदाजे ३२लाख रुपये निधी उपलब्ध होऊन ही संबंधित गुत्तेदार यांना बांधकाम का बंद पाडले संबंधित गुतेदारांला विभागीय नोटीस बजावली असून विस्तृत माहिती उपविभागीय अभियंता यांना माहित आहे.. जि. प. बांधकाम अभियंता घुलेकर हदगांव यांनी या कामास पुढाकार घेऊन पुर्ण करावे अशी मागणी करण्यात येत आहे .

# उपनगराध्यक्षपदीची निवडणूक निर्णयास विलंब व गदारोळ

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगरपरिषद उपनगराध्यक्ष नामनिर्देशन स्विकारण्याची प्रक्रिया सकाळी ११ वा. पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्षा सुजाता काजळे यांच्या अधिकारात निवडणूक प्रक्रिया सुरू झाली . यावेळी नगराध्यक्ष सुजाता काजळे नगरपालिकेमध्ये नगरसेवक शिवसेना शिंदे गटाचे ८ न , उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षगटाचे ६ , उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे १ , काँग्रेस आय पक्षाचे १ , भारतीय जनता पार्टी पक्षाचे २ , व अपक्ष २ असे एकूण २० नगरसेवक उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेत निकाल देण्यास विलंब झाल्यामुळे सायंकाळी ६ च्या दरम्यान पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी जुन्नर नगरपरिषद मध्ये पोलीस बंदोबस्त वाढवला . नगरपरिषद व परिसरात जास्त गर्दी झाल्यामुळे पोलिसांनी कडक नियमाचे अवलंबन केले. यावेळी दुपारी १ : ३० छाननी व दुपारी दुपारी १ : ४५ वा. उमेदवारी मागे घेण्याची प्रक्रिया यानंतर उपनगराध्यक्ष उमेदवार जाहीर करणे होते , पण निवडणूक प्रक्रियेत गदारोळ व विलंब झाल्याने उपनगराध्यक्ष पद जाहीर करण्यात आले नाही. याबाबत मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी ताबडतोब निवडणूक प्रक्रियेतील तांत्रिक अडचण निर्णय घेण्यासाठी प्रांत अधिकारी गोविंद शिंदे , तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांना सायंकाळी ५ : वा . जुनून नगरपरिषद मध्ये बोलविले. याबाबत प्रांत अधिकारी गोविंद शिंदे व तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांनी सांगितले की उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणूक निकालाबाबत निर्णय लवकरात लवकर दिला जाईल असे सांगितले.

# उपनगराध्यक्षपदी शिवसेनेच्या सुवर्णा शाम राक्षे यांची बहुमताने निवड

**चाकण : (समर्थ गांवकरी)**

चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत शिवसेनेच्या (शिंदे गट) सौ. सुवर्णा शाम राक्षे यांची बहुमताने निवड झाली. नगराध्यक्षा मनिषा सुरेशभाऊ गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली. मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गटनेते नितीन गोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्र. ३ (अ) च्या नगरसेविका सौ. सुवर्णा शाम राक्षे यांची उपनगराध्यक्षपदी निवड करण्यात आली.



या निवडणुकीसाठी सूचक म्हणून ज्येष्ठ नगरसेवक प्रकाश लक्ष्मण गोरे तर अनुमोदक म्हणून अनिल इंदाराम लोहकरे हे होते. विरोधी गटाकडून आकाश जाधव यांनी अर्ज दाखल केला होता. पिठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया राबवली. हात वर करून घेतलेल्या मतदानात सौ. सुवर्णा राक्षे यांना १६ मते तर आकाश जाधव यांना १० मते मिळाली. त्यानंतर पिठासीन अधिकारी मनिषा गोरे यांनी सुवर्णा शाम राक्षे यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली.

याच सभेत स्वीकृत नगरसेवकपदी शिवसेना चाकण शहरप्रमुख महेश शेवकरी, आझाद हिंद मंडळाचे कार्यकर्ते शशिकांत जाधव तसेच विरोधी पक्षाकडून विकास धाडगे यांची निवड झाल्याचे नगराध्यक्षा मनिषा सुरेशभाऊ गोरे यांनी जाहीर केले. या संपूर्ण प्रक्रियेत मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. उपनगराध्यक्ष निवडीनंतर नगराध्यक्षा मनिषा गोरे, गटनेते नितीन गोरे तसेच शिवसेना पक्षाच्या नगरसेवकांनी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष सौ. सुवर्णा राक्षे आणि स्वीकृत नगरसेवक महेश शेवकरी व शशिकांत जाधव यांचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना सौ. सुवर्णा राक्षे यांनी स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांना अभिवादन केले. शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने तसेच नगराध्यक्षा मनिषा गोरे आणि गटनेते नितीन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण शहरातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सर्व सहकारी नगरसेवकांचे त्यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास नगरसेवक रणजित जरे, हर्षद लेंडघर, प्रेम जगताप, मंगेश कांडगे, प्रकाश भुजबळ, धीरज मुटके, आकाश जाधव, साहेबराव कड, सागर बनकर, नगरसेविका जयश्री नायकवाडी, साधना गोरे, रुपाली कांडगे, आरती परदेशी, पुनम शेवकरी, स्वाती लेंडघर, अनिता घोगरे, वर्षा शेवकरी, रेश्मा मुटके, तृप्ती जगनाडे, विजया तोडकर, विजया जाधव यांच्यासह सर्व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिक्त पदांवर सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरती नियुक्ती

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तात्काळ कार्यवाहीचे सीईओ मेघना कावली यांचे स्पष्ट आश्वासन



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांच्या मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्याची कार्यवाही आजपासूनच सुरू करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिले आहे.

विशेषतः माहूर तालुक्यातील आदिवासी व अनुसूचित जाती-जमातींची लोकसंख्या ८० टक्क्यांहून अधिक असून येथे पेसा कायदा लागू आहे. या तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये ३८५ मान्य शिक्षक पदांपैकी तब्बल १०८ पदे रिक्त असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

परिणामी आरटीई कायद्याचे उल्लंघन होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष जीवनराव वडजे आणि गणेशराव कोंडावार यांनी मांडली.

या दोन्ही पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. २६ जानेवारी २०२६ पर्यंत रिक्त पदांवर नियुक्त्या न झाल्यास, शासन व जिल्हा परिषद प्रशासनाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका दाखल करून न्याय मिळवून देण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

सध्या शिक्षक समायोजन प्रक्रियेवर स्थगिती (स्टे) असतानाही विद्यार्थ्यांचे नुकसान टाळणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन सेवानिवृत्त शिक्षकांना तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त्या देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी आजच सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड यांना दिले.

### शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी जलद कार्यवाही

ही संपूर्ण प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळले जाईल, असेही मेघना कावली यांनी स्पष्ट केले. विशेषतः आदिवासी, दुर्गम आणि पेसा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा मूलभूत हक्क अबाधित ठेवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

# डॉ.श्याम गणवीर यांना लीडरशिप व्हिजिनरी एक्सलन्स अवॉर्ड प्रदान



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर मधील विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ फिजीओथेरपी चे प्राचार्य डॉ. श्याम गणवीर यांना सांगली येथे फिजीनोव्हा राष्ट्रीय परिषद मध्ये लीडरशिप व्हिजिनरी एक्सलन्स अवॉर्ड ने सन्मानित करण्यात आले. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या स्कूल ऑफ फिजिओथेरपी सांगलीच्या वतीने आयोजित केलेल्या "फिझीनोव्हा 2.0 राष्ट्रीय परिषद २०२६" या दुसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय फिजिओथेरपी परिषदेस चांगला प्रतिसाद मिळाला. या परिषदेत वेगवेगळ्या राज्यातून मोठ्या संख्येने लोकांचा सहभाग होता. यात तज्ञ अभ्यासक आणि उत्साही लोकांनी एकत्र येऊन फिजिओथेरपी प्रॅक्टिसचे भविष्य विकास व सहकार्य या मुद्द्यांवर चर्चा केली.

या परिषदेचे उद्घाटन स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या स्मृतीस अभिवादन करून झाले. या परिषदेस सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, दिल्ली येथील फिजिओथेरपीस्ट इंडियन उपाध्यक्ष डॉ.सुरेश बाबू रेड्डी, भारती विद्यापीठ मेडिकल सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ.अस्मिता जगताप, पुणे येथील भारती विद्यापीठ डॉ.प्रकाश गुरव तसेच अधिष्ठाता GMC मिरज मान्यवरांच्या उपस्थितीत परिषदेचा शुभारंभ झाला.

# नेवासा प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी गुरूप्रसाद देशपांडे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नेवासा प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी दैनिक दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी गुरूप्रसाद देशपांडे यांची सार्वनुमते निवड करण्यात आली आहे.

प्रेस क्लबचे जेष्ठ पत्रकार अशोकराव डहाळे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार (दि.१२) रोजी झालेल्या बैठकीत हि निवड करण्यात आली.

या बैठकीत पत्रकारांसाठी विविध उपक्रम विषयी चर्चा, विविध विषयांवरील पत्रकार परिषदांचे आयोजन आणि पत्रकार परिषदांसाठीचे नियोजन,शहरातील पत्रकारांचे प्रलंबीत प्रश्न, गेल्या अनेक वर्षा पासून प्रलंबीत असलेल्या पत्रकार भवन व वसाहतीचा प्रश्न या बाबत चर्चा करण्यात आली.

कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण यांनी स्वागत केले. तर दैनिक सकाळचे प्रतिनिधी व मावळते अध्यक्ष मोहन गायकवाड यांनी प्रास्ताविक करून संघाच्या कामकाजाची माहिती सांगितली.



यावेळी प्रेसक्लब कार्यकारणी पुढील प्रमाणे- उपाध्यक्षपदी कैलास शिंदे (पुढारी) व अशोक डहाळे (सामना),सचिवपदी लोकमतचे सुहास पठाडे, सहसचिवपदी मकरंद देशपांडे (सार्वमत), खजिनदारपदी मोहन गायकवाड ( सकाळ) कार्याध्यक्षपदी सुधीर चव्हाण (राष्ट्र सह ), संघटकपदी पवन गरुड व रमेश शिंदे (सार्वमत ) यांची निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष मोहन गायकवाड यांनी मागील कालावधीतील उपक्रमातील माहिती दिली. तसेच यावेळी त्यांचा मागील वर्षातील चांगल्या कामकाजाबद्दल प्रेस क्लबच्या वतीने अभिनंदनचा ठराव घेण्यात आला.त्यास सर्वानुमते संमती देण्यात आली. या बैठकीस शंकर नाबदे,नानासाहेब पवार,शाम मापारी,अभिषेक गाडेकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# अनिल शिंदे यांच्या घरी छापा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हवाल्याने मोठी रक्कम आल्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस व निवडणूक यंत्रणेच्या भरारी पथकाने सोमवारी (१२ जानेवारी) सायंकाळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांच्या निवासस्थानी छापा टाकला. मात्र, या तपासणीत कोणतीही संशयास्पद रक्कम अथवा साहित्य आढळून आले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या घटनेनंतर शिंदे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे हे प्रभाग क्रमांक १५ मधून महापालिका निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# प्रा. महेश मोरे यांची साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील शैक्षणिक क्षेत्रातील नावलौकीक असलेल्या जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा येथील या संस्थेच्या वतीने स्वातंत्र्यसेनानी गोविंदराव धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यार्थ आठ वे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन दि.१९ जानेवारी रोजी सोमवार बरबडा येथे

आयोजन केले आहे .पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष माजी जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दिलीप ऊर्फ माधव धर्माधिकारी बरबडेकर व

सदाशिवराव धर्माधिकारी बरबडेकर यांनी महेश मोरे यांची यावर्षीच्या स्वातंत्र्यसेनानी गोविंदराव धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यार्थ बरबडा संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड केली आहे.



महेश मोरे यांचे शिवार ,हिरवे रान, पाऊसकाळ हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. लोक वाङ्मयगृह मुंबई येथून त्यांची बोऱ्याची गाठ ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. त्यासोबत गावपांढरी ही कादंबरी ही प्रकाशित आहे.

अध्यक्ष पदाचे पत्र देताना संयोजक मुख्याध्यापक तथा प्राचार्य सुदर्शन धर्माधिकारी, प्रा. वसंत शिंदे , प्रा.व्यंकटेश सोळंके, प्रा.बालजी बोकारे प्राध्यापक महेश नलबरवार हे उपस्थित होते. तसेच उपमुख्याध्यापक गणेश बडूरे, कॉलेजचे पर्यवेक्षक तगडपल्लेवार टी.जे, पर्यवेक्षक फड एस.एन. तिप्पलवाड एन. एम., , प्रा. हिवराळे एम.आर.,प्रा. मुदखेडे पि.एच, सदाशिव कवळे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.कवी लेखक कादंबरीकार प्राध्यापक महेश मोरे यांची बरबडा संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

त्यांच्या या निवडीबद्दल डॉ . जगदिश कंदम , भाई गुरुनाथराव कुरुडे, डॉ. पुरुषोत्तम धोंडगे , अँड .मुक्तेश्वर धोंडगे प्राचार्य डॉ. अशोक गवते पाटील, पवळे बी. के.,येसलवाड पी. एल जेष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी, दिगंबर कदम, , श्रीकांत देशमुख, डॉ. सुरेश सावंत, दत्ता डांगे, शंकर वाडेवाले.प्रा. नारायण शिंदे. बि. के. पवळे वानखेडे एम.बी. चिवळे व्ही. एस. अनेक साहित्यिकांनी तेचे अभिनंदन केले आहे .

# मुलांच्या कोणत्याही कलागुणांना कमी समजू नका, दुर्लक्ष करू नका

- अ. भा. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांचे प्रतिपादन
- ज्ञानसंपदा व्याख्यानमाला तिसरे पुष्प

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

प्रत्येक माणूस वेगळया कामासाठी घडवला आहे. एका छापाची माणसे निर्माण करण्याकडे जो कल आहे तो चुकीचा आहे. भविष्याचा वेध घेताना काळ हा झपाटयाने बदलतोय मुलांचा भवितव्यांचा विचार करत असताना त्यांचा अंतरंग व अंतर्नाद काय सांगतो हेही शिक्षक व पालकांनी विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.




मुलांच्या कोणत्याही कलागुणांना कमी समजू नका कुठल्या कलागुणांमुळे व्यक्तिमत्व झळाळून निघेल हे सांगणे खूप कठीण आहे.त्यामुळे त्यांच्या कलागुणांकडे दुर्लक्ष करू नका. असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले.

ज्ञानसंपदा स्कूल आयोजित १५ व्या ज्ञानसंपदा व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी भविष्याचा वेध घेताना या विषयावर गुंफले. संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज,उपाध्यक्ष मिलींद गंधे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रा. जोशी यांनी सर्व उदयोजकांना पाठराखण करून जी संस्था उभी केली त्या संस्थेच्या वतीने गेली १५ वर्ष अव्याहतपणे ही व्याख्यानमाला सुरू आहे यांचा मला आनंद होत आहे खरंतर जिथं लक्ष्मीच्या पैश्याचा खणखणट असतो तेथे सरस्वती विणेचा झंकार शक्यतो ऐकायला येत नाही पण येथे लक्ष्मीच सरस्वतीच्या पाठीशी उभी रहाली आहे हे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक दुर्मिळ उदाहरण म्हणून आवूर्जन उल्लेख केला पाहीजे.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले की, आजच्या मुलामध्ये कोणते प्रश्न येतील हे सांगता येत नाही मुलं चौकसपध्दतीने विचार करतात जीवन जगण्याची कला शिक्षणात तुम्हाला अंतर्भूत करावी लागेल. गुरू स्थानी असलेले शिवाजी भोसले असे म्हणत चिमणीचे पिल्ले ४० दिवसात आकाशात भरारी घेतात माणसं चाळीस वर्षाचे झाले तरी आपला उत्कर्ष करू शकत नाही. चिमणीच्या पिल्लाला पंख आतून फुटलेले असतात कारण आपण पदव्या बाहेरून लावलेल्या असतात त्यामुळे आतून ज्ञानाचे पंख निर्माण करणारे शिक्षण ही काळाची गरज आहे,त्यासाठी साऱ्यांनी प्रयत्न करावे लागणार आहेत.

# अहिल्यानगर शहरात कडक बंदोबस्त

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या गुरूवारी (१५ जानेवारी) मतदान प्रक्रिया पार पडणार असून, शुक्रवारी (१६ जानेवारी) मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहर पोलिसांकडून दोन दिवसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मतदान व मतमोजणी शांततेत पार पाडण्यासाठी सुमारे दोन हजारांहून अधिक पोलीस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड रस्त्यावर असणार आहेत. महापालिका निवडणुकीसाठी आज मंगळवार (१३ जानेवारी) हा जाहीर प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत प्रचाराची मुदत असून, त्यानंतर उद्या (बुधवारी) छुप्या प्रचार केला जाणार आहे.

# सायकलिंग खेळासाठी निवड चाचणी संपन्न

## महाराष्ट्रातून १४ जिल्हातील १४१ खेळाडूंचा उस्फूर्त सहभाग

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सायकलिंग आसोसिएशन ऑफ महाराष्ट्र व सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) यांच्या मार्गदर्शनाखाली सायकलिंग खेळासाठी १४-१५ वयोगटातील खेळाडूंकरिता राज्यस्तरीय निवड चाचणी वाडिया पार्क क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे यशस्वीरीत्या पार पडली.या निवड चाचणीत संपूर्ण महाराष्ट्रातून १४ जिल्हातील एकूण १४१ खेळाडूंनी सहभाग नोंदवला.



याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे प्रतिनिधी सुदाम रोकडे,सायकलिंग आसोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव प्रा. संजय साठे तसेच पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा.गिरीश पाखरे आदींसह खेळाडू उपस्थित होते.पंच म्हणून सायकलिंग असोसिएशन अहिल्यानगरचे अध्यक्ष प्रा.साईनाथ थोरात,एन आय एस कोच दिनेश भालेराव,विश्वेशा मिस्किन,अमित सर,परदेशी सर,शैलेश गवळी,बाबर सर,सागर कोळपकर, विनायक भुतकर,भाग्यश्री पालवे,गौरव आडसुरे, युवराज चौधरी,सोमनाथ खंडागळे,व क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे यांनी काम पाहिले. सहभागी खेळाडूंच्या आरोग्य तपासणीसाठी व वैद्यकीय सेवेसाठी डॉ. मुरलीधर जाधव यांनी सहकार्य केले. रोड सायकलिंग, ट्रॅक सायकलिंग व माऊंटन बाईक (एम.टी.बी.)या क्रीडा प्रकारांसाठी घेण्यात आलेल्या शारीरिक व मैदानी चाचणीत खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी सादर केली. या निवड प्रक्रियेतून निवड झालेल्या खेळाडूंना दिल्ली येथे स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया(SAI) यांच्या सहकार्याने होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील निवड चाचणीत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

# गोळीबार करुन हत्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील चांदा येथील गावठी कट्ट्यातून गोळीबारामुळे मयत झालेले शाहिद राजमहमद शेख यांच्या हत्याप्रकरणी सोनई पोलिसात दोघांवर गुन्हा दाखल झाला असून शेळी खरेदी-विक्रीच्या व्यवहारातील उधारीवरून वाद झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत शाहिद शेख याचा चुलतभाऊ यासीन इब्राहिम शेख (वय-३९) यांनी सोनई पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले की, शाहिद शेख हा शेळी-बोकड विक्रीचा व्यवसाय करत होता. त्यामध्ये अक्षय बाळू जाधव यांचेकडे शेळी-बोकड विक्रीचे २५ हजार रुपये बाकी होते. पैसे परत मिळण्यासाठी शाहिद शेख यांनी अक्षय जाधव यांच्याकडे गत महिन्यातच पैशाची मागणी केली होती. त्यावेळीही त्यांच्यात मोठा वाद झाला होता. काल सुरज लतीफ शेख यांच्या शेतात कंदुरीचा कार्यक्रम होता. तेथे बोकड कापण्यासाठी शाहिद शेख याला बोलवण्यात आले होते. तेथे गेल्यानंतर सायंकाळच्या सुमारास शाहिद शेख, सुरज लतीफ शेख, अक्षय बाळू जाधव यांच्यात वाद सुरू झाले. वाद एवढे विकोपाला गेले की शाहिद शेख याच्या छातीवर गोळ्या झाडण्यात आल्या. ही माहिती आपल्याला मिळताच आपण घटनास्थळी गेलो. तेथे पाहिले असता शाहिद शेख याच्या छातीवर गोळ्या झाडलेल्या दिसल्या. तो त्याच ठिकाणी गतप्राण झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर आपण सोनई पोलिसांशी संपर्क केला.

# गुंड शाही संपुष्टात आण्यासाठी विजयी करा : खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड शहरात मोठ्याप्रमाणात गुंडगिरी वाढली आहे. या गुंडगिरीचा काही राजकिय पुढाऱ्याकडुन अश्रय मिळत आहे. तो मोडीत काढायचा असेल तर नागरिकांनी संघटीत व्हावे. आणि आपल्या भागाचा विकासात्मक कामे करायचे असेल तर भाजपाच्या सर्व उमेदवाराला विजयी करा आणि नांदेड वाघाळा शहर महानगर पालकेत एकहाती सत्ता द्या.मी गुंडशाही मोडीत काढून विकासाची गंगा आणेल असे मत माजी मुख्यमंत्री खा अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त करत .सिडको-हडको ,कौठा प्रभागातील भाजपाच्या "नवरत्नांना "विजयी करावे असे ते म्हणाले.



नांदेड वाघाळा महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी दि १२ जानेवारी रोजी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भाजपाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण ,खा. डॉ अजित गोपछडे ,माजी आ.अमरनाथ राजुरकर, राम पाटील रातोळीकर ,दिलिप कंदकुर्ते ,बालाजी पांडागळे,एकनाथ पवार,बालाजी पुणेगावकर,डॉ सचिन उमरेकर,यांच्यासह भाजपा पदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी सिडको-हडको प्रभागातील भाजपाचे उमेदवार संजय घोगरे ,सौ सुवर्णा सतिश बस्वदे,मंगला गजानन देशमुख,वैजनाथ देशमुख ,सौ निरजंना राजु लांडगे यांच्या प्रचारार्थ ह्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खा. अजित गोपछडे यांनी या भागातील विकासात्मक कामे करायचे असेल तर भाजपाच्या उमेदवारांना प्रचंड मतानी विजयी करण्याचे आवाहन केले.

पुढे बोलताना अशोकराव चव्हाण म्हणाले,या भागातील असंख्य नागरिक यांनी सिडकोचे घर घेताना बाँडवर घराची खरेदी केली परंतु ते घर नावावर होत नसल्याने अडचनीत आले आहे. त्या घराचे हस्तातरंण करुन देण्याची जिम्मेदारी हि महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळ यांनी घेतली आहे. गेल्या अनेक वर्षापासुन वास्तव्यास असलेल्याना पिआर कार्ड देणार आहेत. भाजपाच्या जाहिरनाम्यात घोषीत केलेल्या सर्व गोष्टी भाजप करुन नांदेड शहर मॉंडेल शहर बनविनार असल्याचा निर्धार केला आहे. जिल्हयातील काही राजकिय पुढारी हे गुंडगिरीला प्रोत्साहन देण्याचे काम करत आहेत. स्वपक्षातल्याच लोकावर अपहरण करूण हल्ला केल्याची घटना सिडको भागात घडली आहे. वाघाळयातील जिवन पाटील यांना मारहान कोणी केली . असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे आ.चिखलीकर यांच्यावर बोट ठेवले. तर नांदेड शहरात सिटी बसेस सुरु करण्याचा विचार आहे. औद्योगिक वसाहतीचा विस्तार करुन या भागात मोठे उद्योग निर्माण करायचे आहे. आरोग्य सेवेच मोठे योगदान मुख्यमंत्री यांनी दिले आहे.कँन्सर रोगावर उपचार होण्यासाठी मोठा निधी उपलब्ध केला आहे.

आता इतर ठिकानी उपचारासाठी जाण्याची गरज नाही. सर्व सुविधा येथेच मिळणार आहेत. त्यामुळे भविष्यात युवकांना रोजगार ,नागरिकांना वैद्यकिय सेवा,शिक्षण ,क्रिडा क्षेत्रातील युवकांना अध्यावत क्रिडांगन,नाट्यगृह यासह विविध गोष्टी सोयी सुविधा करण्याचा मानस भाजपाचा आहे. यासाठी निधिसुधा उपलब्ध आहे. फक्त मनपात भाजपाची एकहाती सत्ता द्या. असे ते म्हणाले.

या भागातील "टायगर "संजय घोगरेचं

संजय घोगरे पाटील यांना निवडणुकीत पाडण्यासाठी तिन आमदार सिडको-हडको भागात फिरत आहेत. परंतु संजय घोगरे यांच्या मागे येथील जनता आहे. त्यामुळे ते विजयी होतीलचं. गेल्यावेळी आम्ही ज्याच्या मागे होतो. त्याचा विजय झाला. आज ते संजय घोगरे यांच्या विरुद्ध आहे. परंतु येथील जनता हुशार आहे .ती जनता आता टायगर संजय घोगरे पाटील यांच्या मागे आहे. त्यामुळे संजय घोगरे हे टायगर आहे. असे खा. चव्हाण यांनी आपल्या मनोगत पर भाषणात उल्लेख आहे या वेळी या सभेत हजारोंच्या संख्येने मोठया प्रमाणात जनता जनार्दन यांची गर्दी दिसून आली .